रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २५२
www.ramprahar.com

रविवार, ३१ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

तबल १६ सायकली चोरणारा बालक पोलिसांच्या ताब्यात/२

भाताण बोगद्याजवळ कार अपघातात चौघे जखमी/५

नागोठणे प्रीमियर लीगचे शानदार उद्घाटन/८

## चार दिग्गजांचा भारतरत्न पुरस्काराने मरणोत्तर सन्मान



**नवी दिल्ली** : माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह, पी.व्ही. नरसिंह राव, कर्पूरी ठाकूर आणि एमएस स्वामीनाथन यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मान केला आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी राष्ट्रपतींच्या हस्ते शनिवारी (दि.३०) हा सन्मान स्वीकारला. या सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्य आणि अन्य नेते उपस्थित होते. माजी उपपंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनाही भारतरत्न देण्यात येणार आहे. त्यांची प्रकृती आणि वय लक्षात घेत राष्ट्रपती रविवारी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना सन्मानित करणार आहेत. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# बारामतीमध्ये नणंद विरुद्ध भावजय लढत

## सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार यांना उमेदवारी





**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी खासदार शरद पवार गटाकडून शनिवारी (दि.३०) पाच उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली. यात बारामतीमधून सुप्रिया सुळे यांचे नाव प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी घोषित केले. यानंतर काही वेळातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे आता बारामतीमध्ये सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशा नणंद आणि भावजय यांच्यातील लढतीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

खासदार शरद पवार गटाने जाहीर केलेल्या इतर चार मतदारसंघांमध्ये वर्ध्यातून अमर काळे, दिंडोरीतून भास्करराव भगरे, शिरूरमधून डॉ. अमोल कोल्हे आणि अहमदनगरमधून निलेश लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांनी आधीपासूनच बारामतीमध्ये प्रचाराला सुरुवात केली होती. या दोघींनाही आता आपापल्या पक्षाकडून अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे बारामतीमध्ये प्रचाराला वेग येणार आहे.

## महादेव जानकर परभणीतून मैदानात



**मुंबई** : राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर हे महायुतीकडून परभणीतून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी शनिवारी (दि.३०) पत्रकार परिषद घेऊन घोषणा केली.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार तटकरे म्हणाले की, महायुतीच्या जागावाटपाची प्रक्रिया सुरू आहे. भाजपने २४ उमेदवार घोषित केले. शिवसेनेने आठ जागांवर उमेदवार जाहीर केले. रायगड व शिरूर जागांवर राष्ट्रवादीचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारांची घोषणा केली असून उर्वरित जागांवर सकारात्मक चर्चा सुरू आहे.

आम्ही परभणीची जागा मागितली होती. केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत ही जागा आम्हाला देण्याचे ठरले आहे. महायुतीचे हित लक्षात घेता ही जागा महादेव जानकरांना देण्याचे ठरले आहे, असे म्हणत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी जानकरांच्या नावाची घोषणा केली.

दरम्यान, परभणीत ठाकरे गटाचे संजय जाधव खासदार आहे. त्यामुळे महादेव जानकर विरुद्ध जाधव अशी लढाई होणार आहे. परभणीची जागा रासपला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून देण्यात आली आहे. जानकर यांच्या पक्षाने गेल्या दोन महिन्यांपासून कामाला सुरुवात करीत प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यामुळे ही लढतही रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

# ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील यांच्या स्नुषा भाजपमध्ये दाखल

## डॉ. अर्चना पाटील यांचा पक्षप्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

माजी केंद्रीय गृहमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील-चाकुरकर यांच्या स्नुषा डॉ. अर्चना पाटील यांनी शनिवारी (दि.३०) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजप प्रदेश कार्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत डॉ. पाटील यांचा पक्षप्रवेश झाला.

या कार्यक्रमाला लातूरचे महायुतीचे उमेदवार खासदार सुधाकर श्रृंगारे, आमदार संभाजी पाटील-निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार राणा जगजीतसिंह पाटील, माजी आमदार सुधाकर भालेराव, भाजप प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, विक्रांत पाटील, माधवी नाईक, प्रवक्ते गणेश हाके, बसवराज पाटील आदी उपस्थित होते. डॉ. अर्चना पाटील यांच्या प्रवेशामुळे भाजपला मराठवाड्यात आणखी बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला. याच कार्यक्रमात उदगीरचे नगराध्यक्षपद अनेक वर्षे भूषविणारे राजेश्वर निटुरे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेली १० वर्षे पंतप्रधान मोदी ज्या प्रकारे देशाच्या विकासाला दिशा, गती देत आहेत त्याने प्रभावित होऊन डॉ. अर्चना यांनी सामाजिक क्षेत्रातून राजकीय क्षेत्रात येण्याचा व भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रामाणिक व मूल्याधिष्ठीत राजकारण करणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील-चाकुरकर यांचा समृद्ध वारसा डॉ. अर्चना पाटील भाजपमध्ये काम करून पुढे नेतील, असा विश्वास आहे. अर्चना पाटील यांच्या प्रवेशामुळे लातूर लोकसभा मतदारसंघात भाजप उमेदवार सुधाकर श्रृंगारे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असेही त्यांनी नमूद केले. सर्वसामान्यांसाठी कार्य करणारे, उदगीरचे आठ वेळा नगरसेवक व सात वेळा नगराध्यक्ष राहिलेले निटुरे यांच्या प्रवेशामुळे भाजपला अनुभवी, परिपक्व नेतृत्व लाभले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले.

डॉ. अर्चना पाटील म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज देशाचा विकसनशील ते विकसित देश असा वेगवान व विलक्षण प्रवास सुरू आहे. नारी शक्ती वंदन विधेयक पारित करून मोदीजींनी महिलांचा सन्मान राखला. महिला आरक्षणाचा कायदा संमत झाल्यानंतर आपण भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला. जात, धर्म-पंथ या पलिकडे जात समाजातील शेवटच्या माणसाचा विकास हा मोदीजींचा ध्यास असून त्यांना साथ देण्याची आपली इच्छा आहे. भाजप नेतृत्व जी जबाबदारी देईल ती सचोटीने पार पाडू, असेही त्यांनी सांगितले.

# जरांगे-पाटील निवडणुकीच्या रिंगणाबाहेर

## लोकसभेसाठी अपक्ष उमेदवार देणार नसल्याची घोषणा

**जालना : प्रतिनिधी**

वेळ कमी पडल्याने गावागावातील मराठा समाजापर्यंत पोहचता आले नाही. आलेले अहवाल अपुरे आहेत. त्यामुळे मी लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार उभे करणार नाही. कोणाला पाठिंबा देणार नाही. मराठा आणि कुणबी एकच आहे. सगेसोयऱ्यांची अंमलबावणी करण्यासह इतर मागण्यांबाबत जे उमेदवार काम करतील त्यांना मतदान करा, असे



आवाहन मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केले आहे.

मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी (दि.३०) अंतरवाली सराटी येथे बैठक घेतली आणि दिवसभरात आलेल्या अहवालाचा अभ्यास करून लोकसभेसाठी उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. अनेक ठिकाणी गावखेड्यातील मराठ्यांपर्यंत पोहचण्यासाठी वेळ कमी पडला. आलेला अहवाल अपुरा आहे. त्यामुळे आरक्षण आणि लेकरांचे वाटोळे होऊ नये यासाठी लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार द्यायचा नाही. आपण विधानसभेची तयारी आतापासूनच सुरू करू, असे जरांगे-पाटील म्हणाले.

## भाजपकडून उमेदवारांची आठवी यादी जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची आठवी यादी जाहीर केली आहे. या यादीत ओडिशातील तीन, पंजाबमधील सहा आणि पश्चिम बंगालमधील दोन लोकसभा जागांसाठी उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे.

पंजाबमधील गुरुदासपूर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार आणि बॉलीवूड अभिनेते सनी देओल यांच्या जागी दिनेश सिंग यांना तिकीट देण्यात आले आहे. देशात लोकसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. त्यामुळे सर्वच पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर करण्यात येत आहे. यामध्ये भाजपने आघाडी घेतली आहे.

## निवडक

### नवाब मलिक यांची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल




**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री नवाब मलिक यांची प्रकृती अचानकपणे बिघडली आहे. त्यामुळे त्यांना कुर्ला येथील क्रिटिकेअर सेंटर रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले आहे. मलिक नेमके कोणत्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल झाले आहेत हे अद्याप समजू शकलेले नाही, पण सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### वर्ल्डकपसाठी एप्रिलच्या शेवटी होणार भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली** : आयपीएलनंतर टी-२० विश्वचषक स्पर्धा होणार आहे. यंदा ही स्पर्धा अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये खेळली जाणार आहे. स्पर्धेत २० संघ सहभाग घेणार आहेत. या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी एप्रिल महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात भारतीय संघाची घोषणा केली जाणार आहे. बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआय वृत्तसंस्थेला ही माहिती दिली.

# अखेर विजय शिवतारेंची बारामतीमधून माघार

## 'घड्याळा'ला पुरंदरमधून दीड लाख मते देणार



**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात बारामतीमध्ये बंड पुकारणारे शिवसेना नेते, माजी आमदार विजय शिवतारे यांनी अखेर माघार घेतली आहे. शिवतारेंच्या नरमाईमुळे महायुतीमधील एक तिढा सुटला आहे. घड्याळाला पुरंदरमधून दीड लाख मते देणार, असे त्यांनी म्हटले आहे.

दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह विजय शिवतारेंचा एक फोटो प्रसिद्ध झाला होता. त्यावरून शिवतारे निवडणुकीचा हट्ट सोडणार हे निश्चित झाल्याचे बोलले जात होते. त्यानंतर त्यांनी शनिवारी (दि.३०) पुरंदर येथे पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा सत्तारूढ करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने काम करू, असे सांगितले.

शिवतारे म्हणाले की, २६ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांच्या ओएसडींचा मला फोन आला. त्यांनी माझी समजूत काढली. त्यामुळे मी माझा विचार बदलला. या फोननंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा झाली. माझ्या ज्या प्रमुख मागण्या होत्या, त्यापैकी गुंजवणी धरणाचे पाणी पुरंदरला देण्याचे मान्य करण्यात आले आहे. आचारसंहितेमध्ये या योजनेचे पेपरवर्क पूर्ण करून आचारसंहिता संपल्यानंतर कामाचे निर्देश देण्यात येतील, अशी माहिती शिवतारे यांनी दिली.

राजकारणामध्ये कुणीच कुणाचा कायमचा शत्रू नसतो आणि मित्रही नसतो. या सूत्रानुसार आम्ही मागच्या सर्व गोष्टी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवाराला बहुमत निवडून आणणार आहोत, असेही शिवतारे म्हणाले.





# भाजप नेत्यांकडून पाटील परिवाराचे सांत्वन

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या व माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. भाजपच्या नेत्यांनी पेझारी येथे जाऊन मीनाक्षीताईंच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले आणि पाटील परिवाराचे सांत्वन केले.

मीनाक्षी पाटील यांच्या निधनाचे वृत्त समजल्यावर भाजप नेते तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदींनी अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे जाऊन मीनाक्षीताईंना श्रद्धांजली वाहिली तसेच त्यांचे बंधू शेकाप सरचिटणीस आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, पुत्र आस्वाद पाटील व कुटुंबीयांचे सांत्वन केले.

मीनाक्षीताईंच्या निधनाने शोक व्यक्त होत आहे. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## मतदान जनजागृती



**पेण : लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. अशाच प्रकारे विद्यार्थ्यांची रॅली काढून नागरिकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले.** **(वृत्त पान ५ वर..)**

# घरफोडी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

### आरोपी अटकेत, सात लाखांचे दागिने हस्तगत

### रायगड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड स्थानिक गुन्हे शाखेने घरफोडी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी एका आरोपीस मध्य प्रदेशातून ताब्यात घेतले असून त्याच्याकडून सात लाख रुपयांचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.



काही दिवसांपूर्वी अलिबाग शहरात घरफोडीच्या घटना झाल्या आहेत. त्या उघड करण्याबाबत रायगड स्थानिक गुन्हे शाखा समांतर तपास करीत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी अलिबाग पोलीस ठाण्यातील घडफोडीच्या गुन्ह्यांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव व कर्मचारी पथक तयार करून करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या पथकाने सायबर सेलची तांत्रिक मदत घेऊन गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न केले.

वरिष्ठांच्या परवानगीने सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, उपनिरीक्षक धनाजी साठे व पथकाने मध्य प्रदेशात जाऊन घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी मडिया रायसिंग मकवाना (रा. सिंगाचौरी ता. टाडा जि.धार, मध्य प्रदेश) यास शिताफीने ताब्यात घेतले व गुन्ह्यात अटक करून पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली. त्याच्याकडे कसून तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली देऊन चोरलेले दागिने गावी ठेवल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी पुन्हा तेथे जाऊन एकूण सात लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

गुन्ह्याच्या तपासात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, सहाय्यक निरीक्षक भास्कर जाधव, उपनिरीक्षक धनाजी साठे, हवालदार अमोल हंबीर, प्रतिक सावंत, जितेंद्र चव्हाण, बाबासो पिंगळे, रूपेश पिंगळे, शिपाई अक्षय सावंत, सचिन वावेकर, भरत तांदळे, लालासाहेब वाघमोडे, अक्षय जगताप तसेच सायबर सेलचे पोलीस नाईक तुषार घरत, शिपाई अक्षय पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

# चार दिग्गजांचा 'भारतरत्न'ने मरणोत्तर सन्मान

## भाजप नेते अडवाणी यांना आज होणार पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी (दि. ३०) देशातील चार व्यक्तिमत्त्वांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. यामध्ये माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह, पी.व्ही. नरसिंह राव, कृषी शास्त्रज्ञ डॉ एमएस स्वामीनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर. भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनाही भारतरत्नने सन्मानित करण्यात येणार होते, मात्र त्यांची प्रकृती व वय लक्षात घेत ३१ मार्च रोजी राष्ट्रपती त्यांच्या घरी जाऊन अडवाणी यांचा सन्मान करणार आहेत. अडवाणी वगळता इतर चारही व्यक्तींना मरणोत्तर भारतरत्न देण्यात आला. त्यांच्या कुटुंबीयांनी राष्ट्रपतींकडून सन्मान स्वीकारला.

माजी पंतप्रधान नरसिंह राव यांचा भारतरत्न पुरस्कार त्यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव यांना स्वीकारला. एम.एस. स्वामिनाथन यांचा भारतरत्न पुरस्कार त्यांच्या कन्या डॉ.नित्या राव यांना स्वीकारला. कर्पूरी ठाकूर यांचा भारतरत्न पुरस्कार त्यांचा मुलगा रामनाथ ठाकूर यांनी स्वीकारला. चौधरी चरण सिंह यांचा भारतरत्न पुरस्कार त्यांचे नातू जयंत चौधरी यांनी स्वीकारला. यंदा पाच व्यक्तींना भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. मदन मोहन मालवीय, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, भूपेन हजारिका



आणि नानाजी देशमुख यांना २०१४मध्ये सत्तेत आल्यानंतर मोदींच्या कार्यकाळात हा सन्मान मिळाला आहे. २०२४मधील पाच सेलिब्रेटींसह आतापर्यंत हा सन्मान ५३ जणांना मिळाला आहे.

राष्ट्रपती मुर्मू यांनी कर्पूरी ठाकूर यांना त्यांच्या १००व्या जयंतीच्या एक दिवस आधी २३ जानेवारी रोजी भारतरत्न देण्याची घोषणा केली होती. कर्पूरी ठाकूर हे दोनदा बिहारचे मुख्यमंत्री आणि एकदा उपमुख्यमंत्री होते. मागासवर्गीयांच्या हिताचा पुरस्कार करण्यासाठी ते ओळखले जातात. ९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदींनी डॉ. एमएस स्वामीनाथन, पीव्ही नरसिंह राव आणि चौधरी चरण सिंह यांना भारतरत्न (मरणोत्तर) देण्याची घोषणा केली होती. स्वामीनाथन हे कृषी शास्त्रज्ञ होते. त्यांना भारतातील हरित क्रांतीचे जनक म्हटले जाते. नरसिंह राव हे देशाचे नववे पंतप्रधान होते. चरणसिंग हे भारताचे पाचवे पंतप्रधान होते. ते उत्तर प्रदेशचे पाचवे मुख्यमंत्रीदेखील होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि कल्याणासाठी समर्पित केले होते.

### आतापर्यंत ५३ जणांचा गौरव

*केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने पाच दिग्गजांना भारतरत्न देण्याची घोषणा केली होती. तत्पूर्वी, २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजप सरकार आल्यानंतर, महामना मालवीय, पंडित अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, भूपेन हजारिका आणि नानाजी देशमुख यांना सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित करण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ५३ जणांना भारतरत्न देण्यात आले आहे.*

# मालमत्ता कर भरा, जप्ती टाळा!

## ✻ पनवेल महापालिकेचे नागरिकांना आवाहन
## ✻ एका दिवसात तब्बल १२ कोटींचा भरणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर भरण्याचे शेवटचा एक दिवस शिल्लक राहीला असून, मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या सुनावणीनूसार मा. उच्च न्यायालयाने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही.त्यामुळे महापालिकेच्या मालमत्ता करांमध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे. मालमत्ता कर भरण्याची ३१ मार्च शेवटची तारीख असल्याने सुट्टीच्या दिवशी रविवारीही महापालिकेचे कार्यालय सुरू राहणार आहे.



आजवरच्या मालमत्ता करांच्या दररोजच्या संकलनामधील उच्चांकांमध्ये आज भरघोस वाढ दिसून आली. एका दिवसात १२ कोटींचा भरणा महापालिकेच्या तिजोरीत आज झाला आहे. दिनांक १ मार्च ते ३० मार्चदरम्यान सुमारे ५२ कोटीची वसुली मालमत्ता कर विभागाने आतापर्यंत केली आहे. एकुणच महापालिकेच्या चारही प्रभागातून मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा मोठा प्रतिसाद आज दिसून येत आहे.

नुकत्याच झालेल्या सुनावणीनूसार मा. उच्च न्यायालयाने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे सध्या १७ वसुली पथकांच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रात वसुली मोहिम सुरू आहे. आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या यांना आता वॉरंट नोटीसा देण्याचे काम पालिकेने युध्दपातळीवर सुरू केले आहे. तसेच अटकावणीच्या मोहिमेलाही सुरूवात करण्यात आली आहे. याचा थकबाकीदार यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, करअधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून आज चारही प्रभागातून उच्चांकी वसुली झाली आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. गेल्या पंधरा-वीस दिवसापासून दररोज दीड कोटीहून अधिक भरणा होताना दिसत आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध पच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत ३५२ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे.

महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# तब्बल १६ सायकली चोरणारा बालक खांदेश्वर पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल परिसरात रहिवाशी सोसायटीमधील लॉक न करता पार्क केलेल्या तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणावरील १६ सायकली चोरणाऱ्या विधीसंघर्षग्रस्त बालकास खांदेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून जवळपास एक लाख ३५ हजार रुपये किंमतीच्या एकूण १६ रेंजर सायकली हस्तगत केल्या आहेत.



गेल्या काही दिवसांपासून नवीन पनवेल, खांदेश्वर परिसरात महागड्या सायकली चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात अरुणकुमार गोस्वामी यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात सायकल चोरीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार पोलीस उपायुक्त परि ०२, विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपुत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे, पोलीस निरीक्षक गुन्हे संजय चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चासकर, अमित पाटील, हवालदार उदय देसाई, शिपाई सचिन पवार, स्वप्नील कोळी यांनी गोपनिय बातमीदार यांचे मदतीने मुलाची माहिती घेतली.

यानुसार या गुन्ह्यात एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन हा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. त्याच्याकडून एक लाख ३५ हजार रूपये किंमतीच्या एकूण १६ रेंजर सायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

# कै.भास्कररावांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज शास्त्रीय संगीत मैफील

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शास्त्रीय संगीताचा वारसा लाभलेले आणि शास्त्रीय संगीताची परंपरा आपल्या गायकीतून निर्माण करणारे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायक पंडित डॉ. प्रकाश संगीत यांनी आपले वडील आणि गुरू, कै. भास्करराव संगीत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रविवारी (दि. ३१) सायंकाळी ६ वाजता, वाशी येथील योग विद्या निकेतनमधे शास्त्रीय संगीत मैफीलीचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध बासरीवादक पं. संतोष संत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

दरम्यान, ग्वाल्हेर घराण्याची गायकी आत्मसात करण्यासाठी भास्करराव संगीत यांनी ग्वाल्हेरला जाऊन कुंडल गुरू आणि राजाभैया पूछवाले यांच्याकडे गायकीचे धडे गिरवले. स्वातंत्र्यपूर्व काळात वर्धा या आपल्या मूळ गावी परतल्यानंतर भास्कररावांनी ब्रिटिश सरकारची नोकरी न पत्करता आर्थिक धस सोसून खासगी शाळेत संगीत अध्यापनाला सुरुवात केली. १९४० साली त्यांनी शिवानंद संगीत विद्यालयाची स्थापना करून संगीत प्रचार आणि प्रसार करत शेकडो विद्यार्थी तयार केले. भास्करराव संगीत सेवाग्रामला, तिथल्या आश्रमवासियांना भजनावली शिकवण्यासाठी जात असत.

या कार्यक्रमात पं. डॉ. प्रकाश संगीत स्वत, तसेच त्यांचे सुपुत्र डॉ. चैतन्य शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. हा कार्यक्रम विनामुल्य असून अधिक माहितीसाठी नंदिनी नारायणी (९५११६४९५७०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**मुंबई : भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश माध्यम विभागाच्या मीडिया सेंटरचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते गणेश हाके, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते. या सेंटरच्या माध्यमातून आगामी लोकसभा निवडणूक काळात पत्रकारांना आवश्यक माहिती दिली जाणार आहे.**

# रयतमाऊलींच्या पुण्यतिथीनिमित्त गव्हाण विद्यालयात अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्णालाही लाजवेल असे दातृत्व असलेल्या, पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्धांगिनी ज्यांना रयत शिक्षण संस्थेमध्ये वहिनी किंवा रयत माऊली म्हणून संबोधले जाते अशा दानशूर लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.




रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीसाठी आपल्या अंगावरील ९० तोळे सोने तसेच वेळप्रसंगी आपले मंगळसूत्र ही सावकाराकडे गहाण ठेवून वसतिगृहातील मुलांना पोटभर जेवू घालणाऱ्या रयत माऊलींचा ३० मार्च हा पुण्यस्मरणाचा दिवस. श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत कनिष्ठ महाविद्यालय, गव्हाण कोपर येथे रयत माऊलींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री. गोडगे, उपप्राचार्य श्री. मंडले, लाईफ मेंबर आर.एस. भोईर, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख श्री. पाटोळे आणि सर्व रयत सेवकानी वहिनींच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यालयातील इंग्रजी अध्यापक डी. के. म्हात्रे यांनी श्रीफळ वाढवून वहिनींना अभिवादन केले. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी केले. रयत शिक्षण संस्थेत तीस मार्च आणि फाल्गुन अमावस्या म्हणजेच गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी विद्यार्थ्यांना काहीतरी गोड पदार्थ खाऊ घालून वहिनींच्या स्मृतीस उजाळा दिला जातो.



**पोलादपूर : शहराचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी रवळनाथांची पालखी देवस्थानाच्या कमानीजवळ आल्यानंतर काठी पालखी नाचविताना भक्तगण, पोलादपूर भैरवनाथनगरामध्ये पालखीचे आगमन महिलांनी लेझीम खेळत फेर धरून आनंदाने साजरे केले. भैरवनाथनगर महिला सभागृहाजवळ महिलेने पालखीचे दर्शन घेतले, तर बाजारपेठेतून पुन्हा लोकवस्तीकडे पालखी नेण्यापूर्वी भाविकांनी जल्लोषामध्ये पालखी नाचविण्यास सुरुवात केल्याचे दृश्य.**

# सुधागड विद्यासंकुलाचे दत्तात्रेय शिंदे सेवानिवृत्त

**कळंबोली : बातमीदार**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलाचे कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रेय जानु शिंदे हे आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानिमित्य विद्या संकुलात सेवापूर्ती निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलाचे कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रय जाणू शिंदे हे शासनाच्या नियमानुसार व नियत वयोमानानुसार ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त होत आहेत. विद्यालयाच्या वतीने सेवापूर्ती व निरोप समारंभ सुधागड विद्या संकुलाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी भूषविले. या वेळी के आ बांठीया विद्यालयाचे मुख्याध्यापक भगवान माळी, संस्थेचे प्रशासन अधिकारी मिलिंद जोशी, रायगड जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सचिव संजय खडे, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका छाया विजापुरे, वरिष्ठ लेखनिक बिना कडू तसेच दत्तात्रेय शिंदे व त्याचा परिवार उपस्थित होता.



# अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल खांदा गावातून लग्न समारंभातून परतताना एकाचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ३०) जेएनपीए महामार्गावर दुपारी ३च्या सुमारास घडली आहे. ही भयानक अपघात रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार उरण तालुक्यातील मोठी जुई गावातील माजी उपसरपंच वसंत तुळशीराम भोईर हे शनिवारी पनवेल येथील खांदा गावातून आपल्या भाच्याच्या लग्न समारंभातून पलस्पे - जेएनपीए महामार्गावरून आपल्या मोटरसायकलवरून मोठी जुई गावाकडे दुपारी ठिक तीनच्या सुमारास येत होते.

वसंत भोईर हे मुंबई शहराकडे जाणाऱ्या अटल सेतू या चिर्ले गावाजवळील उड्डाण पूलाजवळ आले असताना महामार्गावर बेकायदेशीर पार्किंग केलेल्या मालवाहू ट्रेलरला त्यांच्या मोटरसायकने धडक दिली. या वेळी झालेल्या अपघातात वसंत भोईर हे जागीच मृत्युमुखी पडले.

# रेल्वेच्या तिन्ही मार्गावर आज मेगाब्लॉक

**मुंबई :** उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती तसेच सिग्नल यंत्रणेची तांत्रिक कामे करण्यासाठी रविवारी (दि. ३१) रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या माटुंगा ते मुलुंड अप आणि डाऊन धीम्या मार्गावर, तर हार्बर मार्गावरील पनवेल ते वाशी अप आणि डाऊन मार्गावर मेगाब्लॉक आहे; तर पश्चिम रेल्वेवर मुंबई सेंट्रल ते चर्चगेट अप आणि डाऊन जलद मार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे.

## दुखवटा

### पंढरीनाथ रूठे

**कर्जत :** तालुक्यातील बीड (बुद्रुक) गावातील पंढरीनाथ आंबो रूठे (वय ६४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, दोन कन्या, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. पंढरीनाथ अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते.



# फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

## लग्न जुळवण्याच्या नावाखाली तरुणीकडून सहा लाख उकळले

**पनवेल : वार्ताहर**

लग्न जुळवण्याच्या साईटवर स्वतःसाठी वर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या २८ वर्षीय तरुणीकडून एका भामट्याने सहा लाख ३१ हजारांची रक्कम उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नबील मुनीर खान (वय ३०) असे या भामट्याचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली २८ वर्षीय तरुणी खारघर परिसरात आई-वडील व बहिणीसह राहण्यास आहे. ही तरुणी एका एक खासगी हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. या तरुणीने वर्षभरापूर्वी स्वतःसाठी वर शोधण्यासाठी लग्न जुळवणाऱ्या वेबसाईटवर आपली नोंदणी केली होती. त्यानंतर नोव्हेंबर २०२३मध्ये नबील मुनीर खान या भामट्याने या तरुणीसोबत ओळख वाढवली होती. त्यानंतर नबील याने या तरुणीसोबत व्हॉट्सॲपवरून चॅटिंग तसेच बोलणे सुरू केले होते तसेच त्याने तरुणीच्या वडिलांसोबत फोनवरून बोलणी करून त्यांच्या मुलीसोबत लग्न करण्याची इच्छादेखील व्यक्त केली होती. त्या वेळी भामट्या नबील याने त्याचे मूळ गाव महाड येथे असल्याचे व सध्या तो मुंब्रा येथे राहत असल्याचे सांगितले होते तसेच त्याचा दक्षिण आफ्रिका देशात मायनिंगचा तर मुंबईतील डोंगरी भागात टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असल्याचे सांगून १० तरुणींवर आपली छाप पाडली होती. त्यानंतर भामट्या नबील याने तरुणीसोबत व्हॉट्सॲप चॅटिंग, कॉलिंगद्वारे संवाद सुरू ठेवून तिचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर भामट्या नबीलने तो दक्षिण आफ्रिकेत असल्याचे तसेच भारतातील त्याचे बँक खाते फ्रीज केल्याचे तसेच बिझनेससाठी त्याला पैशांची गरज असल्याचे अशी वेगवेगळी कारणे सांगून तरुणीकडे पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली.

नबील हा होणारा पती असल्याने या तरुणीनेदेखील त्याला सुरुवातीला एक लाख ३७ हजार रुपये ऑनलाइन पाठवून दिले, मात्र त्यानंतर भामट्या नबीलने आईचे ऑपरेशन, भारतात येण्यासाठी विमान तिकिटासाठी तसेच व्यवसायामध्ये नुकसान झाल्याचे कारण सांगून तरुणीला वेगवेगळ्या व्यक्तींच्या बँक खात्यांत पैसे पाठवण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने भामट्या नबील याने चार महिन्यांमध्ये या तरुणीकडून तब्बल सहा लाख ३१ हजारांची रक्कम उकळली, मात्र त्यानंतरदेखील भामटा नबील तरुणीकडून पैशांची मागणी करतच राहिल्याने तरुणीला त्याच्यावर संशय आला. त्यामुळे या तरुणीने त्याच्याकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली असता, त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर या तरुणीने त्याला पोलिसांत तक्रार करणार असल्याचे सांगितले असता, त्याने तरुणीला ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर या तरुणीने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्याला फोनवरून लुटले

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या एका अधिकाऱ्याला फोनवरून फसवणूक केल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे.

खारघर येथील सेक्टर ३५ मध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची वसाहत आहे. या वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका अधिकाऱ्याने संबंधित फसवणुकीची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंदविली आहे. एका मोबाईल फोनवरून आलेल्या संदेशाची पडताळणी करताना एका केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महासंचालक यांचा फोटो व्हॉट्सॲपवरील डीपीवर ठेवून त्यांची ओळख वापरल्याने ही तक्रार नोंदविण्यात आली आहे. संबंधित अनोळखी व्यक्तीने स्वतःची खरी ओळख न सांगता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महानिदेशक यांच्या ओळखीने फोनवरील व्यक्तीला तुम्ही कसे आहात असे विचारून त्यांची ओळख करून घेत होता. त्यामुळे इतर अधिकाऱ्यांनी या फोनवरील व्यक्तीचा शोध काढल्यावर त्याला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महासंचालक हे ओळखत नसल्याचे समोर आले. त्यामुळे या प्रकरणी खारघर येथे राहणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्याने पोलिसांत गुन्हा नोंदविला आहे.

# ढाब्यांवर बेकायदा मद्यविक्री आणि प्राशन करणाऱ्यांवर कारवाई होणार

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील बेकायदेशीर मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यांवर व मद्यप्राशन करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक बी. डी. फणसेकर यांनी सांगितले. नवी मुंबई बार असोसिएशन, रायगड बार असोसिएशन यांनी राज्य उत्पादन विभागाचे निरीक्षक बी. डी. फणसेकर यांची भेट घेऊन विनापरवाना मद्य विक्री व मद्य प्राशन करू देणाऱ्या ढाब्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

पनवेल तालुक्यात मुंबई-गोवा महामार्ग जुना पुणे महामार्ग त्याचप्रमाणे कामोठे, करंजाडे, खारघर, भिंगारी, कळंबोली, खांदा कॉलनी, मोठा खांदा, रोडपाली तळोजा एमआयडीसी रोड, तोंडरे यासह संपूर्ण तालुक्यात ठिकठिकाणी छोटे-मोठे ढाबे निर्माण झाले आहेत या ढाब्यांवर सर्रासपणे मद्यविक्री व मद्य प्राशन केले जात आहे. पनवेल तालुक्यात अनधिकृत ढाबे, हॉटेल चायनीज कॉर्नर, बिअर शॉपी यामध्ये मोठ्या प्रमाणात मद्यविक्री व मद्य प्राशन होते शासनाचा लाखो रुपये महसूल यामुळे बुडतो. यासाठी ढाबाचालकांवर कारवाई करावी, अशी मागणी या वेळी बार असोसिएशनने केली.

पनवेल तालुक्यात मोठ्या प्रमाणात ढाब्यांचे पेव वाढले आहे या ढाब्यांवर बेकादेशीररित्या मद्यविक्री मद्यपान केले जात असल्याच्या तक्रारी आल्या होत्या, तसेच आमच्या पथकांनी ही वेळोवेळी धाडी टाकून कारवाई केली आहे. शंबरहुन अधिक कारवाई, नोटीस, काहींचे तडीपारीची प्रस्ताव अशा प्रकारे कठोर कारवाई केल्याची माहिती नवी मुंबई बार असोसिएशन, रायगड बार असोसिएशन यांनी विनापरवाना मद्य विक्री व मद्य प्राशन करू देणाऱ्या ढाब्यांवर कारवाई करावी यासाठी राज्य उत्पादन विभागाचे निरीक्षक बी. डी. फणसेकर यांची भेट घेतली त्यांनी असता दिली.

या वेळी शिष्टमंडळाला निरीक्षक बी. डी. फणसेकर यांनी सकारात्मक आश्वासन देत विभागाकडे अतिशय तुटपुंजा स्टाफ असून त्यातही कारवाईचा बडगा अधूनमधून आम्ही करत बेकायदेशीररित्या मद्य प्राशन व विक्री करणाऱ्यांवर कारवाई सत्र सुरूच असते काही जणांवर तर अतिशय कठोर असे तडिपारीचे प्रस्तावदेखील केले आहेत. आमच्या विभागासह, महावितरण आणि फूड अँड ड्रग्स विभागालाही आपण तक्रार करून त्यांना परवानगी वीजपुरवठा केला नाही तर असे बेकायदेशीर ढाबे वाढणार नाहीत असे सांगून आमच्या विभागाकडून कारवाई केली जाईलच आपल्याकडे अधिक काही धाब्याची माहिती असल्यास ती आम्हाला यादी द्यावी कारवाई त्यांच्यावर होईलच, असे आश्वासन निरीक्षक बी. डी. फणसेकर यांनी शिष्टमंडळाला दिले.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चावणे येथील जिग्नेश भाऊ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.**

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमाला जन्मठेप व एक लाखांचा दंड

**पनवेल : वार्ताहर**

१० वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या शैलेंद्र लक्ष्मण सहानी याला पनवेल येथील न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा, एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. आरोपी शैलेंद्र आणि दहा वर्षीय अल्पवयीन मुलगी हे शेजारी राहतात. अल्पवयीन मुलीला शैलेंद्र याने २०१६मध्ये पळवून नेऊन अत्याचार करून तिला ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नवी मुंबई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. काही दिवसांत ही मुलगी आणि आरोपी झाशी रेल्वे स्टेशन येथे सापडले. पनवेल येथील विशेष पोक्सो न्यायालयात या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली.

> **अल्पवयीन मुलीवर अत्याचार न्यायालयाने जन्मठेप आणि एक लाखांचा दंड ठोठावला. न्यायालयाने केलेल्या या शिक्षेमुळे असे कृत्य करणाऱ्यांना आळा बसेल आणि लहान मुलांवर अत्याचार करणायांवर करणाऱ्या आरोपीला दहशत बसेल.**
> **-प्रतीक्षा वडे-वारंगे, सरकारी वकील**

सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे- वारंगे यांनी काम पाहिले. १३ साक्षीदार तपासण्यात आले.

यामध्ये पीडित मुलगी, तिची आई, डॉक्टर जया श्रीनिवासन, तपासिक अधिकारी एच.बी. काळसेकर यांची साक्ष महत्त्वाची ठरली. प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून पनवेल विशेष सत्र न्यायाधीश शहिदा शेख यांनी आरोपी शैलेंद्र याला पोक्सो कायदा अन्वये जन्मठेप व एक लाख रुपयांचा दंड ठोठावला.

# साई वर्ल्ड एम्पायरच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

निखळ भव्यतेचे निर्माते, उच्च श्रेणीतील विलासी आणि आधुनिक सुविधांचे सुंदर मिश्रण असलेल्या आणि संस्कृतीचा एक सुंदर स्पर्श म्हणजेच खारघरमधील साई वर्ल्ड एम्पायर. अनेक प्रकारच्या रचनांसह, राहण्यासाठी एक चांगले ठिकाण बनवण्याचा प्रयत्न पॅराडाईज ग्रुपचे संचालक मनीष भतिजा यांनी केला आहे. पॅराडाईज ग्रुपच्या माध्यमातून अनेक गौरवशाली प्रकल्प राबविले आहेत. त्यातीलच एक सर्वाधिक गौरवशाली प्रकल्प हा खारघरमध्ये साई वर्ल्ड एम्पायरच्या नावाने उभा राहिला आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या राजेशाही सोयीसुविधा असलेल्या साई वर्ल्ड एम्पायरच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झाले.



या वेळी नवी मुंबई भाजपचे आमदार गणेश नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी खासदार संजीव नाईक, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पनवेल महापालिकेचे माजी आयुक्त गणेश देशमुख आदींसह मान्यवरांनी पॅराडाईज ग्रुपचे संचालक मनीष भतिजा यांना भेट देत शुभेच्छा दिल्या.

पॅराडाईज साई वर्ल्ड एम्पायरमध्ये ओपन एअर ॲम्फीथिएटर, विश्रांती लॉन, लहान मुलांच्या जलतरण तलावासह विस्तृत जलतरण तलाव, हाय-टेक व्यायामशाळा, वातानुकूलित एरोबिक्स केंद्र, पूल डेक, टॉडलर्स पार्क, भव्य क्रीडांगण, क्रिकेट खेळपट्टी, सायकल डॉकसह सायकलिंग ट्रॅक, स्केटिंग रिंक, जॉगिंग ट्रॅक, मिनी गोल्फ कोर्स, वातानुकूलित ध्यान हॉल, इनडोअर गेम्स रूम, वातानुकूलित स्क्वॅश कोर्ट, मिनी थिएटर, द एथेना क्लब हाऊस, मार्की क्लब हाऊस, आस्वान प्राचीन इजिप्शियन स्पा, इस्पाना किड्स पार्क, कम्युनिटी हॉल, २४७ सुरक्षा आणि सीसीटीव्ही आदी सेवांचा समावेश साई वर्ल्ड एम्पायरमध्ये करण्यात आला आहे.

# बामणडोंगरी गावात शिवजयंती साजरी

**उरण : बातमीदार**

जाणता राजा सामाजिक विकास मंडळ बामणडोंगरी यांच्या विद्यमाने गुरुवारी (दि. २८) बामणडोंगरी गावात मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली.

सकाळी टिम जाणता राजाचे दिवंगत सहकारी स्व.धनंजय म्हात्रे आणि स्व.निवास म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर संस्थेच्या वतीने आयोजित केले होते. तसेच संध्याकाळी संपुर्ण बामणडोंगरी गावात छत्रपती शिवाजी महाराजांची ढोल-ताशांच्या गजरासह पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लहान मुले, महिला वर्ग, तरुण, ज्येष्ठ नागरिक शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. शिवजयंती कार्यक्रमास राजू मुंबईकर (संस्थापक - CON) आणि त्यांचे सहकारी, माधव पाटील (ज्येष्ठ पत्रकार), रामदास नाईक (तंटामुक्ती अध्यक्ष), सुहास म्हात्रे (अध्यक्ष - शाळा व्यवस्थापन समिती), वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्या गीता ठाकूर, विवेक मोकल (शिवप्रेमी), सुंदर म्हात्रे, मंगेश म्हात्रे, किशोर म्हात्रे, अंकुश म्हात्रे, संजय खोत, किरण म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, मनोज नाईक, चंद्रकांत पाटील, रविकांत म्हात्रे, शिवा म्हात्रे, एन.आर.



आय. पोलीस कर्मचारी, उलवे अग्निशमन दल येथील जवान तसेच इतर ग्रामस्थांची उपस्थिती होती.

या वेळी संस्थेच्या वतीने अंकित नाईक, सुहास म्हात्रे, सनी ठाकूर, अक्षय पाटील, रुणीत ठाकूर, रमेश नाईक, प्रतिक पाटील, प्रणिल म्हात्रे, समीर नाईक, सुमित म्हात्रे, चंदन म्हात्रे, आकाश भोईर, आशिष ठाकूर आणि अनिकेत ठाकूर यांनी संपुर्ण कार्यक्रमाचे नियोजन यशस्वीपणे सांभाळले.

रक्तदान शिबिरात ७५ नागरिकांनी सहभाग घेतला त्यापैकी ४७ जणांना रक्तदान करता आले. नवी मुंबई ब्लड सेंटर खारघर यांच्या सहकार्यांनी बामणडोंगरी गावात येऊन रक्तदान शिबिरास मोलाची साथ दिली.

अशा प्रकारे शिवजयंतीनिमित्त रक्तदान सारख्या सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून सामाजिक संदेश देत शिवजयंती साजरी करण्यात आली.

# कडक उन्हाळ्यात रसदार फळांना वाढती मागणी

## पनवेलच्या बाजारात विविध पर्याय उपलब्ध

**पनवेल : वार्ताहर**

उन्हाची काहिली कमी करणारे थंड, मधुर, रसदार फळ. सध्या ऊन दिवसेंदिवस वाढत असताना पनवेल शहरामध्ये ताडगोळे, जांभूळ आणि शहाळ्यांना मागणीही वाढत आहे. उन्हाच्या काहिलीमध्ये तहान भागवण्यासाठीदेखील या फळाचा वापर होतो. त्यामुळे सद्यस्थितीत या फळांना मागणी वाढली आहे. सध्याच्या धार्मिक उपवासाच्या दिवसांमुळे या फळांना चांगली मागणी असल्याने त्यांचे दर वधारले आहेत.





पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर ताडगोळ्याची झाडे आहेत. उन्हाळ्यामध्ये ताडगोळाच्या विक्रीतून स्थानिकांना चांगले पैसे मिळतात. तर शहरी भागामध्ये ताडगोळ्यांना चांगली मागणी आहे. उन्हाळ्यात लिंबू सरबत, उसाचा रस, कैरीचे पन्हे, शहाळे असे अनेक पर्याय उपलब्ध असतात. काहींना थंडगार पेय, आईस्क्रीमचा मोह देखील असतो, मात्र यामुळे आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे नैसर्गिक थंडावा देणारी फळे व पेयाकडे नागरिकांचा कल असतो. शरिराचा दाह कमी करण्यासाठी ताडगोळ्यांचा पर्यायदेखील निवडला जातो. सध्या हेच ताडगोळे शहरातील रस्त्यांवर दिसत आहे. तर नागरिकदेखील ताडगोळे खरेदी करण्यासाठी गर्दी करत आहेत. त्याचप्रमाणे बाराही महिने बाजारात दिसून येणाऱ्या शहाळयाला उन्हाळ्यात जास्त मागणी असते. शहाळ्याचे पाणी उष्णतेवर अधिक परिणामकारक असल्याने त्याचा अधिक वापर होत असतो. निव्वळ पाणी असलेले शहाळे २० ते २५ रुपयाला मिळते.

मधुमेही रुग्णांसाठी फायदेशीर व गुणकारी असलेल्या जांभळे खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी असते. वर्षातून फक्त उन्हाळ्यातच मिळणाऱ्या जांभळांची नागरिक विशेषतः मधुमेही रुग्ण वाट पाहतात, परंतु ती जांभळे ही चढ्या भावाने विकली जातात. सध्या बाजारात २०० ते २५० रुपये किलो असा जांभुळाचा भाव चालू आहे. त्यातच सध्याच्या धार्मिक उपवासाच्या दिवसांमुळे या फळांना चांगली मागणी असल्याने त्यांचे दर वधारले असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये तज्ज्ञ सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या फार्मसी कौन्सिलचे आदरणीय अध्यक्ष डॉ. मोंटुकुमार पटेल यांनी अंजुमन-इ-इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस (AIKTC)मध्ये एका उज्वल तज्ञ सत्रात सहभाग घेतला. ३५० हून अधिक विद्यार्थी या नामांकित तज्ञाकडून माहिती मिळविण्यासाठी उत्सुकतेने सहभागी झाले होते. यामध्ये डॉ. पटेल यांनी त्यांचे फार्मास्युटिकल क्षेत्रातील सखोल ज्ञान आणि अनुभव शेअर केले. त्यांच्या चर्चेत नियामक फ्रेमवर्कपासून उदयोन्मुख ट्रेंडपर्यंत उद्योगाच्या विविध पैलूंचा समावेश होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील क्षेत्राच्या गतीशीलतेची व्यापक माहिती मिळाली.





डॉ. पटेल यांच्या ज्ञानवर्धक सत्रानंतर, विद्यार्थ्यांनी त्यांचे नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प आणि स्टार्टअप प्रयत्नांचे प्रदर्शन केले. डॉ. मोंटुकुमार पटेल यांनी कार्यक्रमानंतर लगेचच त्यांच्या सोशल मीडिया खात्यावर AIKTCच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्साहाची आणि समर्पणाची प्रशंसा केली. या सत्रामुळे कौशल्य आणि आकांक्षेच्या अभिसरणाने निःसंशयपणे एक अमिट छाप सोडली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना भारतातील फार्मास्युटिकल लँडस्केपचे भविष्य घडवण्याच्या दिशेने प्रवास सुरू करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय काझी, नवी मुंबई संस्थेच्या मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हरीस, कॅम्पस डायरेक्टर डॉ. रमजान खाटिक आणि डॉ. शारिक सय्यद यांच्यासह विविध शाळांचे डीन उपस्थित होते. डॉ. राजेंद्र मगर आणि प्रा. राज म्हात्रे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाची भूमिका बजावली.

# ‘मनोरंजन’ @ ५०

## विदेशी थीम तिकडेच बरी...



पिक्चरच्या नावात मनोरंजन असले म्हणून ते पडद्यावर असेलच, दिसेलच असे नाही. बरं, ते दिसले तरी त्या पिक्चरची थीम विदेशी असेल, आपल्याकडच्या पारंपरिक मनोरंजन चित्रपटाच्या हुकमी पब्लिकला रूचणारी नसेल तर?

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला कदाचित आश्चर्य वाटेल, एकेकाळी विदेशी चित्रपट आपला नाही असं मनोमन मानतच आपल्या मराठी व हिंदी चित्रपटावर एकेकाळी बेहद्द प्रेम केले जाई. अगदी आपल्या पिक्चरच्या गोष्टीची पाळेमुळे विदेशी असली तरी ती पचत नसत.

असाच एक पिक्चर ईगल फिल्म बॅनरखालील, एफ. सी. मेहरा निर्मित व शम्मी कपूर दिग्दर्शित मनोरंजन (मुंबईत रिलीज ४ एप्रिल १९७४) अगदी अस्साच. त्याच्या रिलीजला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील. (हा चित्रपट ४ जानेवारीला सेन्सॉर संमत झाला.)

शम्मी कपूरची उछलकूद, धसमुसळा रूपेरी प्रेमिक ही खासियत त्याचं शरीर बेढब झाल्यावर त्याच्यापासून दूर दूर गेली. पडद्यावर रोमान्स करण्याची प्रत्येक हीरोची आपली एक संस्कृती होती, पण वाढते वय व त्यामुळेच सुटणारे शरीर हा त्यात मोठाच स्पीड ब्रेकर. जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित ’अंदाज’ (१९७१)मध्ये हेमा मालिनीचा नायक साकारताना (आणि ’जिंदगी एक सफर है सुहाना’ या केवळ एका सुपर हिट गाण्यातून अख्खा चित्रपट राजेश खन्नाने आपलासा केल्यावर) शम्मी कपूरने नायक म्हणून पूर्णविराम घेतला. काही वर्षांतच बातमी आली, शम्मी कपूर चित्रपट दिग्दर्शनात! भुवया उंचावणारच आणि कौतुकही वाटणार. कपूर खानदानातील राज कपूरने अभिनेता, स्टुडिओ मालक (अर्थात चेंबूरचा आर.के. स्टुडिओ), निर्माता, दिग्दर्शक, संकलक आणि गीत संगीत व नृत्याची उत्तम जाण असलेला अशी ख्याती केव्हाच प्राप्त केलेली. राज कपूरचा पुत्र रणधीर कपूरनेही ’कल आज और कल’ (१९७१)चे दिग्दर्शन करताना आपले आजोबा पृथ्वीराज कपूर, वडील राज कपूर, प्रेयसी (मग पत्नीही) बबिता यांच्यासह स्वतः काम केलेले. त्यानंतर शम्मी कपूर चक्क चित्रपट दिग्दर्शनात ही बातमीच होती. चित्रपटाचे नाव मनोरंजन आणि प्रमुख भूमिकेत शम्मी कपूर, संजीवकुमार, झीनत अमान तसेच देवकुमार, फरयाल, मदन पुरी, पेंटल, असित सेन, आगा, मुराद वगैरे.

त्या काळात चित्रपट निर्मितीचा वेग काहीसा संथ होता. अडीच-तीन वर्षांत एक चित्रपट पूर्ण होताना त्याच्या शूटिंगच्या आणि गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या बातम्या व फोटो प्रसिद्ध होत. चित्रपट हळूहळू प्रेक्षकांपर्यंत येत राही आणि त्यात एक गंमत होती. चित्रपट रसिक यावर गप्पा मारत. त्यातून चित्रपटाबद्दलचे कुतूहल वाढत असे. ’मनोरंजन’चे झीनत अमानचे धाडसी फोटो पाहून नेमकं काय बरे चित्रपटात असणार हा प्रश्न वाढत गेला. देव आनंद अभिनित व दिग्दर्शित ’हरे राम हरे कृष्ण’ (१९७२)मुळे ’दम मारो दम गर्ल’ म्हणून मॉडर्न इमेज झालेली झीनत अमान पाश्चात्य वळणाचे मोकळे ढाकळे व्यक्तिमत्व म्हणून गाजत होती. हिंदी चित्रपटसृष्टीतील पारंपरिक नायिकेच्या परंपरेला हा मोठाच धक्का होता. झीनत अमान गॉसिप्स मॅगझिनमधील आपली धाडसी फोटो सेशन आणि देव आनंद अभिनित व दिग्दर्शित ’हीरा पन्ना’तील कलरफुल बिकीनी रूप, नासिर हुसेन दिग्दर्शित ‘यादों की बारात’ (१९७३)मधील चुरा लिया है तुमने जो दिल को गाण्यातील मादक मोहक रूप असा एक प्रकारचा सांस्कृतिक धक्काच देत होती. मनोजकुमार दिग्दर्शित ’रोटी कपडा और मकान’ (यात मनोजकुमार व शशी कपूरची नायिका), शक्ती












सामंता दिग्दर्शित ’अजनबी’ (पहिल्यांदाच राजेश खन्नासोबत), ब्रीज दिग्दर्शित ’चोरी मेरा काम’ (शशी कपूर नायक), बी. आर. इशारा दिग्दर्शित ’प्रेम शास्त्र’ (देव आनंद नायक) वगैरे अनेक चित्रपट तिला मिळाले होते. अभिनयात जेमतेम असूनही तिला निर्माते, दिग्दर्शक साईन करीत. झीनत अमान पर्व जणू सुरू झाले होते. आणि त्याच वातावरणात तिने ’मनोरंजन’साठी काही बोल्ड दृश्य दिल्याची गॉसिप्स मॅगझिनमधून चर्चा. ही ग्लॉसी पेपरवरील मासिके खरंतर आंबटशौकीनांना पर्वणीच, पण मध्यमवर्गीय मराठी माणसाच्या घरात यांना स्थान नव्हतेच. त्यातील शक्य तितका मसाला मराठीत भाषांतर होत प्रसिद्ध होई. त्यातून काही गोष्टी समजत. एक प्रकारचे ’मनोरंजन’ होई.

’मनोरंजन’मध्ये नेमकं काय बरे असेल, दिसेल याची उत्सुकता असतानाच दोन गोष्टी घडल्या. चित्रपटाच्या गाण्याची तबकडी रिदम हाऊस इतरत्र विक्रीला आली. आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत. आणि गाणी एकदम भारी. ‘आरडीं’चा तो विलक्षण चलतीचा काळ. आया हू मै तुझको ले के जाऊंगा (पार्श्वगायक किशोरकुमार), गोयाके चुनांचे (लता मंगेशकर व मन्ना डे), दुल्हन मै की चली (आशा भोसले, लता मंगेशकर व उषा मंगेशकर), चोरी चोरी सोला सिंगार करूंगी (आशा भोसले). ही गाणी इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्सपासून रेडिओ सिलोनवरील बिनाका गीतमालापर्यंत पोहचलीसुद्धा आणि दुसरी गोष्ट म्हणजे, मिनर्व्हा थिएटरच्या एका शोकेसभरची ’मनोरंजन’ची लॉबी कार्ड्स पाहण्यासाठी आम्ही त्या काळातील फिल्म दीवाने गर्दी करू लागलो. दाढीधारी आणि पोक्त शम्मी कपूर, पोलिसांच्या निळ्या हाफ पॅन्टमधील संजीवकुमार व अतिशय पाश्चात्य वस्त्रातील अल्ट्रा मॉडर्न लूकमधील झीनत अमान ही केमिस्ट्री वेगळीच वाटत होती. त्या काळातील पारंपरिक मनोरंजक चित्रपटाच्या चौकटीबाहेरचा काही तरी मसाला मिक्स प्रकार आहे हे दिसत तर होते, पण नेमकं काय असावे? अशातच समजले, बिल्ली वाल्डर दिग्दर्शित इरमाला डूस या इंग्लिश चित्रपटावर शम्मी कपूरने ’मनोरंजन’ बेतलाय.

आता हा इंग्लिश चित्रपट पाहिलाय कोणी? त्या काळात इंग्लिश चित्रपट म्हणजे दक्षिण मुंबईतील रिगल, इरॉस, स्टर्लिंग, न्यू एम्पायर येथे रिलीज होणारे आणि ज्यांना फारच हायफाय इंग्लिश समजते त्यांचे चित्रपट. आम्ही परीक्षेत इंग्लिशमध्ये पस्तीस-चाळीस गुण मिळवण्याचे ध्येय कायम ठेवणारे. आम्हाला फक्त समजायचे, डर्टी हॅरी या विदेशी चित्रपटावरून खून खून हा चित्रपट घेतलाय. चक्क गुलजार दिग्दर्शित ’परिचय’ची थीम साऊंड ऑफ म्युझिक या विदेशी चित्रपटावर आधारित आहे एवढेच समजे आणि मूळ चित्रपट पाहिला नसल्यानेच हिंदी चित्रपट एन्जॉय करायचो.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

’मनोरंजन’ला मात्र विदेशी कल्पना मारक ठरली. चित्रपटाची नायिका (झीनत अमान) वेश्या असून सिधा साधा चड्डीवाला म्हणून ओळखला जात असलेला पोलीस हवालदार (संजीवकुमार) तिच्याकडे आकृष्ट होतो वगैरे वगैरे गोष्टी आपल्या चित्रपट रसिकांना अजिबात रूचल्या नाहीत. ही आपली गोष्ट नाहीच असाच फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच्या पब्लिकचे मत पडले आणि पिक्चर फ्लॉप झाला. ॲडव्हान्स बुकिंगला पहिल्या तीन दिवसांची तिकीटे विकली गेल्याने ते खेळ हाऊसफुल्ल ठरले तरी ब्लॅक मार्केटमधील तिकीटांचा भाव कोसळला होता. सोमवारपासून बुकिंग क्लर्क प्रेक्षकांची वाट पाहत बसला. गंमत म्हणजे, ’मनोरंजन’चे निर्माते एफ. सी. मेहरा आणि शम्मी कपूर यांच्या मालकीचे मिनर्व्हा थिएटर असूनही अवघ्या चारच आठवड्यात पिक्चर उतरला. पब्लिकला थीमच आवडली नाही म्हटल्यावर काय हो? पब्लिक पसंत, नापसंत हीच तर मोठी खेळी. आपण त्यांना जे दाखवू ते पाहतील असे कधीच होत नसते.

’मनोरंजन’चे लेखन अब्रार अल्वी यांच्यासारख्या अतिशय अनुभवी पटकथा व संवाद लेखकाचे होते. गुरुदत्तच्या ’कागज के फूल’, ’चौदहवी का चांद’, ’साहिब बीवी और गुलाम’ (याचे दिग्दर्शनही त्यांचेच) यांच्यासह प्रोफेसर, सूरज, बहारे फिर भी आयेगी, छोटी सी मुलाकात, संघर्ष, साथी अशा अनेक चित्रपटांनंतर अब्रार अल्वी यांनी ’मनोरंजन’ लिहिला, पण थीमच रसिकांना पचनी पडणारी नव्हती तेथे कोण काय करणार? मनोरंजन स्ट्रीट या रेड लाईट एरियातील ही गोष्ट. त्यात इमोशन्सपेक्षा ग्लॅमर व धाडसी दृश्य जास्त होती. शम्मी कपूर दिग्दर्शनात राज कपूर टच देऊ शकला नाही. वांद्र्यातील मेहबूब स्टुडिओ आणि अंधेरीतील नटराज स्टुडिओत मोठे सेट लावून बरेच दिवस शूटिंग केले. ते सुरू असतानाच सेन्सॉर काही दृश्यांवर कात्री चालवेल अशी कुजबूज होतीच. झीनत अमान त्या काळात पीन अप ॲक्ट्रेस म्हणून ओळखली जाई. कोणी इरॉटीक स्क्रीन प्रेझेन्स असंही म्हणे. अशा उपाधी देण्यात त्या काळात मीडियात चुरस असे. अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिद्धीत मीडियाची भूमिका खूपच महत्त्वाची असे. ते दिवसच वेगळे होते. अब्रार अल्वीचे लेखन असल्यानेच दिल ए भितारी, घंटा ए चौबिश, जवानी इ हरीभरी, जिस्म ए दिलकश असे उर्दूमिश्रित शब्द आले.


निर्माते एफ. सी. मेहरा त्या काळातील खूपच मोठे प्रस्थ. ओ.पी. रल्हन दिग्दर्शित ’मुजरीम’ (शम्मी कपूर व गीता बाली) या १९५८च्या चित्रपटांपासून चित्रपट निर्मितीत एफ.सी. मेहरांनी सातत्य ठेवले. नरेश सैगल दिग्दर्शित ’उजाला’ (राजकुमार, शम्मी कपूर व माला सिन्हा), लेख टंडन दिग्दर्शित ’प्रिन्स’ (शम्मी कपूर व वैजयंतीमाला), सुशील मुजुमदार दिग्दर्शित ’लाल पत्थर’ (राजकुमार, हेमा मालिनी, राखी), के. रमणलाल दिग्दर्शित ’ऐलान’ (विनोद मेहरा, रेखा, विनोद खन्ना) असे चित्रपट निर्माण करीत असतानाच त्यांनी व शम्मी कपूरने भागीदारीत डॉ. भडकमकर मार्गावरील जुने मिनर्व्हा चित्रपटगृह विकत घेऊन नवीन भव्य दिव्य दिमाखदार मिनर्व्हा थिएटर उभे केले. प्रेक्षक संख्या तब्बल १४९९. पहिलाच चित्रपट लाल पत्थर आणि त्यानंतर मनोरंजन, खून खून इत्यादी बरेच. त्यांचे सुपुत्र उमेश मेहरा व राजीव मेहरा चित्रपट दिग्दर्शक झाल्यावर तर ईगल फिल्म बॅनरखालील चित्रपट निर्मिती फारच वाढली... हमारे तुम्हारे, चमत्कार, अशांती, एक जान है हम, शिकारी इत्यादी.

’मनोरंजन’च्या गुणात्मक व म्हणूनच व्यावसायिक अपयशाची चर्चा कायमच होत राहिली. एका मुलाखतीत शम्मी कपूरने यावर म्हटले, एकदा लंडनला असताना तो व बिल्ली वार्ल्डर या दोघांनी एकत्र एक फ्रेंच नाटक पाहिले. त्यावरुन बिल्ली वार्ल्डरने काही वर्षातच ’इर्माला डूस’ बनवला, तो जगभर गाजला. आपण मग या चित्रपटावरुन ’मनोरंजन’ बनवला, पण तेव्हा तो काळाच्या खूपच पुढचा चित्रपट होता. चित्रपटाची नायिका वेश्या असणे आणि तिचं हायफाय जगणे रसिकांना रूचले नाही. म्हणून चित्रपट फ्लॉप झाला असे शम्मी कपूरचे म्हणणे होते. अर्थात, एकदा रसिकांनी चित्रपट नाकारल्यावर असे कितीही कोणी काहीही म्हटले तरी त्याचा उपयोग नसतो. शम्मी कपूरने त्यानंतर राजेश खन्ना व सुलक्षणा पंडित या जोडीच्या बंडलबाज या फॅण्टसी चित्रपटाचे दिग्दर्शन केले. त्याचेही राहुल देव बर्मनचे संगीत लोकप्रिय झाले, पण पिक्चर फसला. मेन थिएटर सुपरवरून असाच चार आठवड्यांत उतरलादेखील. सुपर फ्लॉप.

शम्मी कपूर चित्रपट दिग्दर्शनात प्रेक्षकांचे ’मनोरंजन’ करू शकला नाही हेच खरे. तो त्याचा फंडा नव्हताच. झीनत अमानने मात्र फारच शरीरसौंदर्य घडवले. त्यात नवीन ते काय? ’मनोरंजन’नंतरही तिने राज कपूर दिग्दर्शित ’सत्यम शिवम सुंदरम’, संजय खान दिग्दर्शित ’अब्दुल्ला’, फिरोझ खान दिग्दर्शित ’कुर्बानी’ इत्यादीतही तेच तिने केले... त्यातील काही चित्रपट चक्क सुपरहिटही झाले. तेच तर महत्त्वाचे आहे.

---

# संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर



मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे संपूर्ण नाव बळवंत पांडुरंग किर्लोस्कर. त्यांचा जन्म ३१ मार्च १८४३ रोजी धारवाड जिल्ह्यात गुर्लहोसूर या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत कानडी व मराठी भाषेचा अभ्यास त्यांनी घरीच केला. नंतर कोल्हापूर व धारवाड येथे शिक्षणासाठी राहून मुलकी परीक्षेपर्यंत ते शिकले. त्यापुढील शिक्षणासाठी पुण्यास असताना त्यांना नाटकांचा नाद लागला व ते नाटक मंडळ्यांना पदे रचून देऊ लागले.

स्वतःची नाटक मंडळी काढून अण्णासाहेबांनी काही नाटकेही केली. तथापि, ही नाटक मंडळी मोडली आणि ते गुर्लहोसूर येथे येऊन राहिले. त्यानंतर त्यांनी वकिलीची परीक्षा देण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी न झाल्यामुळे ते नोकरी करू लागले. शिक्षक, जमादार आणि महसूल आयुक्ताच्या कचेरीतील कर्मचारी अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या त्यांनी केल्या.

अण्णासाहेबांनी प्रारंभी अल्लाउद्दिनाची चितुडगडावरील स्वारी हे नाटक लिहावयास घेतले होते, पण ते अपुरेच राहिले. शिक्षक असताना शांकरदिग्जय हे गद्य नाटक त्यांनी लिहिले. पुणे येथे १८८० साली एका पारशी नाटक मंडळीचे ऑपेराच्या धर्तीवरील एक नाटक त्यांच्या पाहण्यात आले. तसे नाटक मराठीत करून दाखविण्याची इच्छा त्यांना होऊन त्यांनी कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतल या नाटकाचे भाषांतर केले. त्यामध्ये स्वतःची पदेही घातली आणि उत्तम नटसंच मिळवून ते रंगभूमीवर आणले. या नाटकास लाभलेले अपूर्व यश आणि लोकप्रियता पाहून १८८०मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीची त्यांनी स्थापना केली. त्यानंतर सुभद्राहरणावरील संगीत सौभद्र हे नाटक स्वतंत्रपणे त्यांनी लिहिले. प्रणयभावनेचे मनोहर चित्रण त्यांनी या नाटकात केले आहे. सुसंघटिक कथानक, अकृत्रिम संवाद, विलोभनीय व्यक्तिरेखा, प्रासादिक पदे आणि नाट्योपरोधावर आधारलेल्या विनोदाचा अखंडपणे वाहणारा अंतःप्रवाह या वैशिष्ट्यांमुळे या नाटकाचे आकर्षण मराठी प्रेक्षकांच्या मनात आजही टिकून आहे. रामराज्यवियोग (दुसरी आवृत्ती १८८८) या त्यांच्या अखेरच्या नाटकाचे तीन अंक लिहिल्यानंतर ते मधुमेहाच्या विकाराने गुर्लहोसूर येथेच २ नोव्हेंबर १८८५ रोजी निवर्तले.

अण्णासाहेब स्वतः चांगले नट व दिग्दर्शक होते. महाराष्ट्रात संगीत नाटकांचे नवे युग त्यांनी निर्माण केले. इतकेच नव्हे तर उत्तम संगीत नाटके कशी असावीत याचा आदर्श घालून दिला. जुन्या विष्णुदासी नाटकांतील सूत्रधार, विदूषक, गणपती व सरस्वती यांच्या अनुक्रमाने होणाऱ्या प्रवेशाची परंपरा सोडून देऊन संस्कृत नाटकातील सूत्रधार, परिपार्श्वक व नटी यांच्या संवादांनी नाटकांची प्रस्तावना करण्याची त्यांनी प्रथा पाडली. नाटक मंडळ्या व नट यांच्याविषयी समाजात असलेली अनुदारपणाची भावना त्यांनी रसिकांना उदात्त करमणुकीचे नवे माध्यम उपलब्ध करून दिले. परिणामी समाजातील उच्च वर्गात मोडणारे लोकही त्यांच्या नाटक मंडळीशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवू लागले.

अण्णासाहेबांनी काव्यरचनाही बरीच केली आहे. पौराणिक नाटक मंडळ्या व कीर्तनकार यांना त्यांनी आख्याने रचून दिली. त्यांना कानडी, उत्तर हिंदुस्थानी आणि मराठी (लावणी इ.) गाण्यांच्या अनेक चाली अवगत होत्या व ते शीघ्रपणे कवने रचू शकत असत. त्यांनी दक्षिणा प्राइझ कमिटीने बक्षीस लावल्यावरून स्पर्धेसाठी शिवाजी महाराजांवर पाचशे आर्यांचे एक दीर्घकाव्य रचिले होते. महाराष्ट्रात १९४३मध्ये साजरी झालेली त्यांची जन्मशताब्दी व त्यांच्या निधनानंतर किर्लोस्कर नाटक मंडळीने पुणे येथे बांधलेले किर्लोस्कर नाटकगृह या दोन घटना त्यांच्या सहकाऱ्यांचे व मराठी रसिकांचे त्यांच्यावर केवढे प्रेम होते याची साक्ष देतात. त्यांच्या सर्व लेखनाचा संग्रह समग्र किर्लोस्कर या नावाने प्रसिद्ध करण्यात आला आहे. (साभार : मराठी विश्वकोष)

# भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी

आनंदीबाई गोपाळराव जोशी या वैद्यकशास्त्रातील पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होत्या. त्यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजी पुणे येथे झाला. आनंदीबाईंचे पूर्वाश्रमीचे नाव यमुना होते. जुन्या कल्याण परिसरातील पारनाका इथे राहणाऱ्या गणपतराव अमृतेश्वर जोशी यांची त्या ज्येष्ठ कन्या. वयाच्या नवव्या वर्षी बालपणातच त्यांचा विवाह वयाने २० वर्षांनी मोठे असणाऱ्या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. लग्नानंतर गोपाळरावांनी आपल्या पत्नीचे यमुना हे नाव बदलून आनंदीबाई असे ठेवले. लग्नानंतर आनंदीबाईंनी वयाच्या १४व्या वर्षी एका मुलास जन्म दिला, पण दुर्दैवाने पुरेशी वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने तो केवळ दहाच दिवस जगू शकला. हीच खंत आनंदीबाईना वैद्यकीय शिक्षणाकडे खेचून घेण्यास कारणीभूत ठरली.



गोपाळराव स्वतः ‘लोकहितवादी’ची शतपत्रे वाचत. आपल्या पत्नीतला शिक्षणात रस आहे हे गोपाळरावांनी जाणले होते. लोकहितवादीच्या शतपत्रातून ते प्रेरित झाले आणि आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याचा निश्चय केला. गोपाळराव पोस्ट ऑफिसात कारकून होते. त्यांची नोकरीनिमित्त बदली होत असे. कोल्हापूर, मुंबई, भुज, कोलकता, बराकपूर, श्रीरामपूर (बंगालमधील) इथे प्रत्येक ठिकाणी गोपाळरावांबरोबर आनंदीबाई जात राहिल्या आणि गोपाळराव तिला शिकवित राहिले.

कोल्हापूरमध्ये मिशनऱ्यांशी ओळख वाढल्यावर तिथे प्रथम गोपाळरावांच्या मनात आले की आनंदीला अमेरिकेला पाठवून तिचे शिक्षण करावे. त्या वेळी गोपाळरावांनाही अमेरिकेला जायची इच्छा होती, परंतु ते काही जमू शकले नाही. आनंदी बुद्धिमान असल्याने त्यांनी इंग्रजी भाषा व अन्य विषय पटकन आत्मसात केले. त्यांना अमेरिकेला शिकायला जाण्यासाठी पशांची तरतूद आवश्यक होती. ती करण्यात व जायला सोबत शोधण्यात दोन-चार वर्षे गेली.

स्त्री डॉक्टरची किती गरज आहे हे ओळखून आनंदीबाई डॉक्टरची पदवी घेण्यासाठी अमेरिकेत गेल्या, परंतु प्रत्येक ठिकाणी त्यांना सतत संघर्ष करावा लागला. अठराव्या वर्षी १८८३मध्ये एका अमेरिकी बाईच्या सोबतीने एकटीने दोन महिन्यांचा बोटीने प्रवास केला. त्यात त्या शाकाहारी आणि साडी हाच पोशाख. बोटीवर त्यांची उपासमार झाली. त्या आजारी पडल्या, पण पुढेही चार वर्षे त्यांची उपासमारच झाली. भारतीय पद्धतीचे अन्न मिळाले नाही. परदेशी कपडे वापरायचे नाहीत म्हणून त्या साडी नेसून धाबळीचे जाकीट घालत. त्यामुळे तिथली बर्फाळ थंडी त्यांचे शरीर चिरत राहिली. त्यात अभ्यास, स्वत:चा स्वयंपाक स्वत: करायचा, समाज-नातलग यांनी दिलेली दूषणे सहन करीत इच्छित कार्य करीत त्या राहत असत तिथला समाजही आनंदीशी कुत्सितपणे वागत होता. तिथेही कार्पेटरबाई आणि कॉलेजच्या प्रिन्सिपॉल इत्यादी चांगल्या स्त्रिया भेटल्या, परंतु अन्य बऱ्याच जणांनी आनंदीला त्रास दिला.

जेव्हा आनंदीबाई भारतात परतल्या १६ नोव्हेंबर १८८६ या दिवशी तेव्हा मुंबई बंदरावर लोकांनी गर्दी केली. त्यांचे पुष्पवृष्टीने स्वागत झाले. त्या आजारीच होत्या, परंतु हिंदुस्थानात घरी जायला मिळणार, घरचे अन्न मिळणार म्हणून त्यांची प्रकृती तात्पुरती स्थिर होती, पण एव्हाना त्यांना क्षयाची बाधा झाली होती. अखेर आनंदीबाई जोशी यांचे २६ फेब्रुवारी १८८७ रोजी निधन झाले.

वयाच्या केवळ अठराव्या वर्षी बोटीने परदेशी जाणारी पहिली स्त्री, हालअपेष्टा सहन करीत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणारी पहिली स्त्री. फक्त भारतातच नव्हे तर परदेशातही कुचेष्टा, अवहेलना, अपमान सहन करीत हाती घेतलेले जीवित कार्य जिद्दीने पूर्ण करणारी स्त्री. भारतीय (महाराष्ट्रीय पोशाख) रीतिभाती, आपला शाकाहारी आहार तिथेही सांभाळणारी, तरी इंग्रजी भाषा उत्तम आत्मसात (ती तिने इथेही केली होती) करून वैद्यकीय शिक्षण प्रकृतीअस्वास्थ्य सांभाळीत पूर्ण करणारी तरुणी. या सर्वाबरोबर पती, नातेवाईक, सुहृद यांना सतत पत्र लिहून त्यांच्याशी संवाद साधणारी डॉ. आनंदीबाई यांच्यावर तिच्या समकालीन आणि लेखिका असलेल्या काशीबाई कानिटकरांनी चरित्र लिहिले आहे. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांना आदरांजली.

**-संजीव वेलणकर**

# भिवपुरी रोड रेल्वेस्थानकावरील उद्वाहनांचे काम लवकरच होणार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत कल्याण दरम्यानच्या भिवपुरी रोड रेल्वेस्थानकावर दोन उदवाहने (लिफ्ट) उभारण्याचे काम सुरू आहे. एक उदवाहन मुंबई एन्डला व दुसरे उदवाहन कर्जत एन्डला असे दोन उदवाहनांचे काम भिवपुरी रोड रेल्वे स्थानकावर कित्येक दिवसापासून सुरू आहे.


हे काम खूपच मंदगतीने होत असल्याने काम केव्हा पूर्ण होईल? व उभारण्यात येणारी उदवाहने प्रवाशांसाठी कधी खुली केली जातील? अशी विचारणा कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता रेल्वे प्रशासनाने सदर उदवाहनांचे काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होईल. असे लेखी कळविले होते, परंतु मार्च महिना संपत आला तरीसुध्दा सदर काम पूर्ण होत नाही असे ओसवाल यांच्या निदर्शनास आल्या नंतर या बाबतीत ओसवाल यांनी पुन्हा रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता आता हे काम एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण होईल. ओसवाल यांना लेखी कळविले आहे

मध्य रेल्वे प्रशासनाने कळविले आहे की, भिवपूरी रोड रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक १ व २ वर उदवाहनांचे काम सुरू आहे. खड्ड्याचे काम पूर्ण झाले असून लिफ्टच्या संरचनेचे काम अभियांत्रिकी विभागाकडून हाती घेण्यात येणार आहे. लिफ्टचे सिव्हिल काम पूर्ण झाल्यानंतर इलेक्ट्रिकल इन्स्टॉलेशन आणि त्यानंतर लिफ्ट चालू करण्यासाठी किमान २५ दिवस आवश्यक आहेत. असे उत्तर काही दिवसांपूर्वी पंकज ओसवाल यांना दिले होते. हे उत्तर समाधानकारक नसल्या कारणाने ओसवाल यांनी पुन्हा अशी विचारणा केली आहे की बाकी असलेले काम साधारण कधी पूर्ण होईल? म्हणजेच अजून किती कालावधी लागणार आहे? याची माहिती देण्याची विनंती रेल्वे प्रशासनास केली. या बाबतींत रेल्वे प्रशसनाकडून ओसवाल यांना दिनांक ११ डिसेंबर २०२३ला, या लिफ्टचे काम मार्च २०२४ ला पूर्ण होईल असे लेखी कळविले होते.

मार्च महिना संपत आला तरी सुध्दा सदर काम पूर्ण होत नाही असे पंकज ओसवाल यांच्या निदर्शनास आल्या नंतर ओसवाल यांनी या बाबतीत पुन्हा रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता आता सदर काम एप्रिल २०२४पर्यंत पूर्ण होईल असे ओसवाल यांना लेखी कळविले आहे.


**भिवपुरी रोड रेल्वे स्थानकावर सुरु असलेल्या उदवाहनांचे काम त्वरित पूर्ण करावे. जेणेकरून प्रवासी वर्ग याचा लाभ घेऊ शकेल.**

**–पंकज मांगीलाल ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**



# खालापुरात बिबट्याचा वावर





**खोपोली : प्रतिनिधी**

दिवसा वाढलेल्या तापमानामुळे आधीच सर्व घामाघूम असताना बिबट्याचा खालापूरातील वावराने खालापूरकराना चांगलाच घाम फुटला आहे. शुक्रवारी रात्री खालापूर मधील काही तरुण जुन्या मुंबई पुणे महामार्गाने चौक कडून खालापूरच्या दिशेने येत असताना खालापूर हद्दीत खडीमशीन जवळ बिबट्या महामार्ग ओलांडून खालापूर गावाचे दिशेने जाताना दिसला.

तातडीने समाजमाध्यमांवर खालापूरात बिबट्या शिरला असल्याचा संदेश प्रसारित झाल्याने भीतीचे वातावरण पसरले. काही जागरूक नागरिकांनी तातडीने वनविभाग कर्मचारी आणि अधिकारी यांना बिबट्या खालापूर परिसरात फिरत असल्याची माहिती दिली. शनिवारी सकाळी वनविभाग कर्मचारी रवींद्र म्हात्रे आणि सहकारी यांनी बिबट्या आढळलेल्या परिसरात पाहणी केली. त्यावेळी बिबट्याचे ठसे आढळून आले. बिबट्या खालापूर लोकवस्तीच्या दिशेने आला असल्याची शक्यता असल्याने नागरिकांची घाबरगुंडी उडाली आहे.

## पाणवठ्याच्या शोधात संचार

*जुन्या मुंबई–पुणे महामार्ग लगत सह्याद्रीचा पर्वत रांगेतील साबाई गड आहे. अनेक वर्षांपूर्वी या गडावर वन्य जीवांचा अधिवास असायचा. वाघदेखील या परिसरात पाहिल्याचे जुने ग्रामस्थ सांगतात. सध्या उन्हाची वाढलेली तीव्रता यामुळे पाणवठ्याच्या शोधात बिबट्या महामार्ग ओलांडून आल्याची शक्यता आहे.*

**खालापूर जंगल परिसर आहे. त्यामुळे बिबट्या दिसल्यास नागरिकांनी घाबरून जावू नये.**

**–राजेंद्र पवार, वनाधिकारी, खालापूर**

# खासदार, आमदार यांच्याकडून वासील बकवाल यांचा सत्कार



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे राहणारे वासील जमीर बकवाल या तरुणाने पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून ४४० किलाचे वजन उचलून दुसरा क्रमांक पटकावला होता. तर राज्याच्या स्पर्धेत वासील याने ४६० किलोचे वजन उचलून संपूर्ण महाराष्ट्रातून पाचवा क्रमांक पटकावला होता. या त्याच्या अद्वितीय यशाबद्दल रायगडचे खासदार सुनील तटकरे व अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी वासील बकवाल याचा शाल श्रीफळ देऊन त्याचा यथोचित सत्कार केला.वासील याचे वडील जमीर बकवाल हे नांदगाव येथील सामाजिक व सांस्कृतिक कार्यात मोठे योगदान आहे.

या वेळी खासदार सुनील तटकरे व आमदार महेंद्र दळवी यांनी आजच्या तरुणांनी स्वतःला कमजोर न समजता आपणास ज्या क्षेत्राची आवड आहे त्या क्षेत्रात नाव कमावण्यासाठी खूप मेहनत घ्यावी यश आपणास निश्चितच मिळणार आहे. वासील बकवाल सारख्या तरुणाने ग्रामीण भागात राहून पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत जे धवल यश मिळवले ते निश्चितच प्रश्नसनीय असल्याचे प्रतिपादन या वेळी त्यांनी केले.

सत्कारावेळी रायगड जिल्हा शिवसेनेचे उप प्रमुख भरत बेलोसे, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोअज्ञम हसवारे, माजी नगरसेवक मनोज भगत, जमीर बकवाल आदी उपस्थित होते.

# आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टी

**मुरुड : प्रतिनिधी**

सध्या मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू असून हिंदू मुस्लिम ऐक्य अबाधित राहण्यासाठी अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्यातर्फे नांदगाव येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासून ते सायंकाळ पर्यंतहा उपवास अजान झाल्यावर सोडण्यात येतो. या वेळी उपवास सोडण्यासाठी विविध लज्ञतदार पदार्थ तसेच विविध फळे, सरबत आदी वस्तूंची चोख व्यवस्था करण्यात आली होती.



नांदगाव येथील माजी सरपंच मोअज्ञम हसवारे यांच्या निवास्थानी याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुस्लिम बांधव यांच्यासमवेत हिंदू बांधव सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी, शिवसेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, अतिक खतीब, हसमुख जैन, तालुका संघटक दिनेश मिणमिने, यशवंत पाटील,मनोज भगत, अजित कासार, शिवसेनेचे मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, माजी सरपंच मोअज्ञम हसवारे, भाजपचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील, बाबा दांडेकर, माजी नगरसेवक पांडुरंग आरेकर, नौशाद पटेल, आण्णा कंधारे, संजय गुंजाळ आदींसह असंख्य मुस्लिम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# होळीनंतर बोटी निघाल्या खोल समुद्रात । माशांची आवक वाढण्याची शक्यता

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड व एकदरा कोळीवाड्यातील कोळी मच्छीमार बांधव होळी उत्सव साजरा करण्यासाठी मुंबई वरुन आपल्या मच्छीमार बोटीमधून मूळ गावी येत असतात. होळी उत्सव आनंदाने आटोपुन पुन्हा आपल्या उदारनिर्वाह करिता आपल्या बोटी पुन्हा घेऊन खोल समुद्रात जाण्यास सज्ञ झाल्या आहेत. मुरूड येथील एकदरा पुलाखाली सहा सिलेंडरच्या असणाऱ्या शेकडो बोटीची डागडुजी कामे पूर्ण करून मच्छीमार कोळी मच्छीमार बांधव रंगपंचमीच्या मृहर्तावर खोल समुद्रात जाण्यास होड्याची रेलचेल सुरू केली आहे. मोठ्या बोटी वर खोल समुद्रात मासेमारी करित असताना भरपूर दिवस राहावे लागते यासाठी मिळालेली मासळी ताजी राहावी यासाठी मोठ्या प्रमाणात बर्फ भरण्यात येत आहे. रॉकेल, डिझेल, महिनाभर पुरेल एवढे धान्य, खाद्यपदार्थ व विविध वस्तू बोटीवर भरण्यास सुरुवात केली आहे.

विविध संकटाना सामोरे जाणारे मच्छीमार पुन्हा नव्या उमेदीने मासेमारी करण्यासाठी खोल दर्यात जाण्यास सज्ञ झाले आहे. संकटचा काळ संपुन मासेमारी मोठ्या प्रमाणात होऊन झालेला कर्ज फिटावे धंद्यात चांगला फायदा मिळावो हीच प्रार्थना समस्त कोळी समाज करित आहेत.

सद्या बाजारात मासळी फार तुरळक आहे. त्यामुळे मासळीचे दर वाढल्याने सर्व सामान्य नागरिक यांचे मोठे हाल झाले आहेत. आवाक्यात दर असतील तर सामान्य नागरिक सुधा मासळी घेतो, परंतु सद्या मासळीचे दर मोठ्या पट्टीने वाढल्याने सर्व सामान्य नागरिक हैराण झाला आहे. मुरूड मासळी मार्केट मध्ये मोठ्या प्रमाणात दर वाढल्याने लोक हैराण झाले आहेत. याबाबत मच्छिमारांकडून असे सांगण्यात येत आहे की, खोल समुद्रात जावून सुधा मुबलक मासळी मिळत नाही. तुरळक मासळी मिळत असल्याने बाजारात मासळीचे दर वाढले आहेत. तसेच खोल समुद्रात एल. इ.डी द्वारे मासेमारी मोठ्या प्रमाणात सुरू आहे, परंतु मत्स्य विभाग कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने अवैध्य व गैर मार्गाने मासेमारी करणाऱ्यांचे चांगलेच फावले आहे. एलईडीद्वारे मासेमारी केल्याने जास्तीत जास्त मासे त्यांना मिळतात व जाळ्या द्वारे मासेमारी करणाऱ्या लोकांना मासेच मिळत नाही. त्यामुळे सर्व सामान्य मच्छिमार खूप हताश दिसून येत आहेत.

याबाबत रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, होळी सुरू झाल्यापासून ते आज रंगपंचमी पर्यंत धगधगणारी होळी विझवण्यात येते. होळीची राख समुद्रात अर्पण करून ईशवराजवळ पार्थना केली जाते. हा शेवटचा हंगाम असून मे पर्यंत पुष्कळ मासे मिळो. मासेमारीतून मिळालेला पैसे जपून ठेवत पावसाळ्याचे चार महिने प्राप्त पैशातून कुटुंब चालवले जाते, अशी माहिती बैले यांनी दिली आहे.



# भाताण बोगद्याजवळ कार अपघातात चौघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील भाताण बोगद्याजवळ एक कार (एमएच ०५ बिएच २६६१) मुंबई हून पुणे येथे जात होती. या वेळी अती वेगात असलेल्या कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने समोरील अज्ञात वाहनाला धडक बसली व मार्ग सोडून बाजूच्या खड्ड्यात आदळून उलटी झाली. या अपघातात तीन महिला जखमी झाल्या असून एक गंभीर आहे.

जखमींना उपचारासाठी कळंबोली येथील एमजीएम रुग्णालय दाखल करण्यात आले आहे. कारचालक सुरक्षित असल्याचे पोलिसांनी सांगितले



जखमींमध्ये भाग्यश्री खराडे (वय ३४), प्रशांत कोरडे (वय ३६) कार चालक किरकोळ जखमी, जानवी कोरडे (वय ३२) गंभीर जखमी तर कांचन चव्हाण (वय ४५) किरकोळ जखमी सर्व रा. लातूर अशी आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पेणमध्ये शालेय विद्यार्थ्यांची रॅलीद्वारे मतदार जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदार संघातील १९१ पेण विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांच्या निर्देशानुसार पेण तालुका स्वीप पथकाच्या मदतीने २८ मार्च व ३० मार्च रोजी म. ना. नेने कन्या विद्यालय व प्रायव्हेट हायस्कूल पेणमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यासोबत मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली व विद्यार्थ्यांना संकल्प पत्र वाटप करण्यात आले. संकल्प पत्र विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना देऊन मतदान जागृती करावयाची आहे असे आवाहन करण्यात आले.



पेण तालुक्यातील जवळपास सर्वच कुटुंबात मुलांच्या द्वारे असे संकल्प पत्र पाठविण्यात आले आहेत. तसेच नगरपालिका हद्दीतील घंटा गाड्या व आसपासच्या गावातील आंबेघर, डोलवी, मळेघर, दुष्मी , कांदळे, वडखळ, कामार्ली या ग्रामपंचायत घंटा गाड्यांवर मतदान जनजागृती संदर्भात जिंगलस्, ध्वनीफीत दररोज वाजविण्यात येत असून नागरिकांमध्ये मतदान संदर्भात जनजागृती करण्यात येत आहे. पेण शहरात तसेच गावांमध्ये विविध ठिकाणी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापूर्वी पतंगराव कदम कॉलेज, पेण तसेच शासकीय विद्या निकेतन, पेण येथे विद्यार्थ्यांची रॅली व ईव्हीएम मशीनचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आहे.

एकूणच पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निवडणुकीचे वातावरण तयार व्हायला मदत होत आहे.


भवतु सब्ब मंगलम्

नागसेन एज्युकेशन सोसायटी
ॲन्ड
बुध्दिस्ट कल्चरल ट्रस्ट मुंबई, संचलित
डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविदयालय
(प्रस्तावित २०२४–२५ मुंबई विदयापीठ सलग्न)
हरि प्लॉझा पहिला मजला,
थरवानी हेरिटेज सीएचएस लि. प्लॉट नं २४,
खारघर पोलीस ठाण्याजवळ, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई

**भरतीसाठी प्रत्यक्ष मुलाखती WALK- INTERVIEW:**

| अ.क्र | पदाचे नाव | शाखा | एकूण पदे | संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | विधी | ०१ | खुला |
| २ | सहा. प्राध्यापक | विधी | ०९ | खुला |

शिक्षकेत्तर कर्मचारी : प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक, लेखपाल, परीक्षा समन्वयक, ग्रंथपाल, पर्यवेक्षक, लिपिक, संगणक ऑपरेटर, शिपाई

टिप : शैक्षणिक पात्रता धारक इच्छुक उमेदवारांनी मुळ कागदपत्रे आणि अर्जासह सुप्पारक भवन, प्लॉट नं ५२, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी मंगळवार, दि. ०२ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित रहावे.

**सही/–**
**सचिव**
नागसेन एज्युकेशन सोसायटी
ॲन्ड बुध्दिस्ट कल्चरल ट्रस्ट मुंबई

# नवी मुंबईतील सीसीटीव्हींचे जाळे अपूर्ण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांच्या कार्यकाळात कार्यादेश मिळाल्यानंतर दोन वर्षे उलटली तरी अद्याप संपूर्ण शहरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर नाही. निम्मे शहर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांविनाच राहिले आहे.

अद्याप कोपरखैरणे ते दिघा हे परिमंडळ २मध्ये सीसीटीव्ही लागले आहेत, परंतु प्रत्यक्षात सीसीटीव्हीची कनेक्टीव्हीटी झाली नाही, तर बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे हे विभाग मात्र सीसीटीव्हीच्या कक्षेत आले आहेत.

महापालिका क्षेत्रात अद्याप १५२४ सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्यातील परिमंडळ १ मध्ये ८३६ तर परिमंडळ ६८८ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या



निगराणीखाली आले असले तरी परिमंडळ २ मध्ये मात्र लावलेल्या ६८८ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या जोडणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी मिळण्यात अडचणी येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे कॅमेरे लागूनही परिमंडळ २ मधील सीसीटीव्ही फक्त शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. सीसीटीव्हीच्या कॅमेऱ्यांची नजर बेलापूर ते वाशी या परिमंडळ १ भागात नववर्षाच्या स्वागतापासून झाली आहे. तर दुसरीकडे कोपरखैरणे ते दिघा या परिमंडळ दोन विभागाला मात्र सीसीटीव्हीची अद्याप प्रतीक्षाच आहे. शहरात जवळजवळ एकूण ११९२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर ठेवली जाणार आहे.

**शहरात नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जवळजवळ १५० कोटी रुपये खर्चातून सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून परिमंडळ १मधील काम पूर्ण झाले आहे. परिमंडळ २मधील कामही लवकरात लवकर कसे पूर्ण होईल याकडे लक्ष देण्यात येईल.**
**–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

**नवी मुंबई महापालिकेने शहरात सीसीटीव्ही लावले असून पोलीस विभागाला गुन्हे शोध तसेच शहरातील नागरिकांच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अधिक मदत होत आहे. संपूर्ण शहर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगरानी खाली आले तर त्याचा अधिक फायदा होणार आहे.**
**–पंकज डहाणे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ १**

# एनएमएमटीच्या ताफ्यातील डिझेल बसगाड्यांकडे लक्ष देण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मनपाचा उपक्रम असलेली एनएमएमटीची बस कितीही उत्तम सुविधा देत असल्याचा दावा केला जात असला तरी एनएमएमटीच्या ताफ्यातील डिझेल बसची अत्यंत दुरवस्था झाली आहे. दरवेळी तात्पुरती डागडुजी करून बस मार्गस्थ केली जात आहे. अत्यंत अस्वच्छ, फाटलेले सीट कव्हर, तुटलेली आसने, उभ्या प्रवाशांना आधार म्हणून कसेबसे उभे असलेले खांब, त्यात गिअर बदलताना चालकाची होणारी तारांबळ अशा अवस्थेतून डिझेल बसमधून प्रवास केला जात आहे.

वर्षानुवर्षे डिझेल बसगाड्यांच्या तांत्रिक व अन्य तपासण्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. एनएमएमटी प्रशासनाबरोबरच उपप्रादेशिक कार्यालयालयाकडूनही दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे अशा बसमधून प्रवास करण्यास केवळ प्रवासीच नव्हे तर तर वाहनचालक, वाहकसुद्धा नाखूश असतात.

नवी मुंबई महापालिकेचा कायम



तोट्यात असलेला उपक्रम म्हणून एनएमएमटी बससेवा ओळखली जात आहे. या सेवेची दोन टोके असून त्यात आलिशान आणि उत्तम अशी विद्युत बस सेवा आहे. तर दुसरे टोक म्हणून सीएजी आणि डिझेल बस. ज्याला खटारा बस म्हणून ओळख मिळालेली आहे. या बस गाड्यांकडे एनएमएमटी प्रशासन गांभीर्याने पाहताच नाही असा आरोप खुद्द एनएमएमटीमध्ये काम करणारे कर्मचारी करतात. एखाद्या बसचे इंजिन उत्तम असेल तर बसवर चांगल्या प्रकारे खर्च करून उत्तम सेवा प्रवाशांना देण्याऐवजी कायमच तात्पुरती डागडुजी करून बस प्रवासी सेवेला दिली जाते. अशा बसचे टायर हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असून महिन्यात किमान ५० वेळा तरी बस पंक्चर झाल्याच्या घटना घडतात. हे प्रमाण आसूडगाव डेपोच्या बस सेवेत जास्त आहे, असा दावा तंत्रज्ञ करतात.

# एपीएमसीत एक हजार टन आंब्याची आवक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळांच्या राजाचे राज्य सुरू झाले आहे. गुरुवारी कोकण व दक्षिणेतून तब्बल १,०२७ टन आंब्याची आवक झाली असून, ६८,९५२ पेट्यांचा समावेश आहे. गुढीपाडव्याच्या मुहुर्तापर्यंत एक लाख पेट्यांचा टप्पा पूर्ण करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बाजार समितीच्या फळ मार्केटमध्ये गुरुवारी दिवसभरात ६५० वाहनांमधून सर्व प्रकारची २८११ टन फळांची आवक झाली. यामध्ये जवळपास अर्धी आवक फक्त आंब्याची आहे. कोकणातून ५५,१४७ व इतर राज्यांतून १३,८०५ पेट्यांचा समावेश आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगडमधून हापूसची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली आहे.

कर्नाटक, केरळ व आंध्र प्रदेशमधून कर्नाटकी हापूस, बदामी, तोतापुरी व केसर आंब्याची आवक सुरू झाली आहे. संपूर्ण मार्केट आंबामय झाले असून, आता जूनपर्यंत मार्केटवर आंब्याचे राज्य राहील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

बाजार समितीमध्ये आंबा घेऊन येणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र गेट उपलब्ध करून देण्यात आले आहे. मध्यरात्रीपासून पहाटे सर्व आंब्याची वाहने मार्केटमध्ये घेऊन येण्याची व्यवस्था केली आहे. कलिंगड व टरबूजच्या वाहनांना दुपारी तीननंतर मार्केटमध्ये प्रवेश दिला जात असून, खाली झालेली वाहने तत्काळ मार्केटबाहेर काढण्यात येत आहेत.




**बाजार समितीमध्ये आंब्याची आवक वाढली आहे. कलिंगड व इतर फळांचा हंगामही सुरू आहे. फळांची मोठ्या प्रमाणात आवक होत असल्यामुळे वाहतूक व व्यापार सुरळीत होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.**
**–संगीता अढांगळे, उपसचिव, फळ मार्केट**

# नवी मुंबईत श्रीगुरू पादुका दर्शन; भाविक नतमस्तक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

'भेटी लागी जिवा लागलिसे आस' अशी ओढ मनात ठेवून आलेल्या हजारो गुरुभक्तांमध्ये 'धन्य आजि दिन झाले संताचे दर्शन... अनंत जन्मांचा शीण गेला' अशीच भावना दाटून आली होती. दोन दिवस गुरुभक्तीत लीन झालेले गुरुसेवक एका वेगळ्याच आत्मिक समाधानाची अनुभूती घेत होते.

एकाच वेळी १८ संत व सद्गुरूंच्या पादुकांवर नतमस्तक होण्याचा योग घडून आल्याने भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम नवी मुंबईत पाहायला मिळाला. संत–महंतांच्या पादुकांच्या सहवासामुळे २६ आणि २७ मार्च असे दोन दिवस वाशीतील सिडको एक्झिबिशन सेंटरचे एखाद्या तीर्थस्थानात परिवर्तन झाले होते, असेच म्हणावे लागेल. दैवी पर्वणीची अनुभूती घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यांतून हजारो गुरुभक्त आले होते. एकीकडे पहिल्या दिवशी सकाळपासून सुरू झालेला गुरुसेवकांचा ओघ दुसऱ्या दिवशी रात्री उशिरापर्यंत सुरू होता आणि दुसरीकडे



भक्तिसोहळ्याचा एक नवा अध्याय लिहिला जात होता.

रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून दोन दिवस परमात्म्याचे ध्यान करता आले. त्यातून मिळालेला अनुभव अवर्णनीय असा आहे. हरवलेली सुख–शांती परत मिळवण्याचे आणि सर्व गुरुसेवकांना अध्यात्माशी जोडण्याचे काम श्रीगुरू पादुका दर्शन उत्सवाने केले, अशी भावना सोहळ्यात सहभागी झालेल्या गुरुसेवकांनी उत्स्फूर्तपणे व्यक्त केली. असा आध्यात्मिक सोहळा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला. असे नियोजन यापूर्वी कधीही पाहण्यात आलेले नाही. शब्दांमध्ये वर्णन करता येणार नाही, असा अप्रतिम सोहळा पार पडला. खरे तर तो आणखी काही दिवस सुरू ठेवायला हवा होता. पुढील सोहळ्यासाठी आम्ही आतापासूनच अधीर झालो आहोत, असे सांगताना अनेक गुरुसेवकांचे डोळे पाणावले होते. प्रत्येकाच्याच चेहऱ्यावर आणि डोळ्यात साक्षात गुरूंची भेट झाल्याचे भाव होते.

श्रीगुरू बालाजी तांबे यांच्या आशीर्वादाने झालेल्या पादुका दर्शन उत्सव सोहळ्यात सहभागी झाल्याचे समाधान सर्व स्तरांतून व्यक्त होत होते. २६ मार्चची सकाळ उजाडताच गुरुसेवकांच्या बरोबरीने असंख्य वारकरी संतपरंपरा जपणारी वेशभूषा धारण करून वाशीतील सिडको एक्झिबिशेन सेंटरमध्ये दाखल झाले. त्यांच्या सेवेला स्वयंसेवकांची मोठी फौज होती. एका शिस्तीत त्यांना पादुका मंदिरात सोडण्यात येत होते. मंदिरात प्रवेश करताना येत असलेली दिव्यत्वाची प्रचीती पाहून आपोआप सर्वांचे हात जोडले जात होते. सर्वांच्या डोळ्यात गुरुभेटीची एकच आस होती. राज्याच्या विविध ठिकाणांहून गुरुभक्त, वारकरी, कीर्तनकार, भाविक, साधक आणि सेवेकरी मंदिरात गटागटाने दाखल होत होते. प्रचंड गर्दीतही योग्य नियोजनामुळे त्यांना विनासायास गुरुचरणी नतमस्तक होता येत होते.

एक्झिबिशनचा भव्य परिसर झेंडे, टाळ–मृदंग आणि वारकऱ्यांनी फुलून गेला होता. सोहळ्याच्या दोन्ही दिवशी त्यांच्या भक्तिसंगीताचा वर्षाव गुरुसेवकांवर होत होता. मंदिराच्या प्रवेशद्वारीच विठुमाउली, शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांची हुबेहूब प्रतिकृती लक्ष वेधून घेत होती. दिंडी, रिंगण सोहळा, बाल वारकऱ्यांच्या खेळांचे सादरीकरण, भजन–कीर्तन, हरिनामाचा गजर इत्यादींचा ओघ दोन दिवस सुरू होता. अनेक गुरुसेवक उत्स्फूर्तपणे त्यात सहभागी होत एका अद्भुत क्षणाचे साक्षीदार होत होते. रांगेतही त्यांचा उत्साह कायम होता. दिव्यांग आणि वृद्धांसाठी व्हिलचेअरची सेवा उपलब्ध होती. स्वयंसेवक आणि गुरुसेवक त्यांच्या मदतीसाठी तत्पर होते.

# पाणीदार ताडगोळ्यांना बाजारपेठेत मागणी



**उरण : रामप्रहर वृत्त**

सध्या वाढलेल्या उन्हाच्या तडाख्यापासून सुटका होण्यासाठी नागरिक विविध उपाय करीत आहेत. थंडगार लस्सी, शीतपेय, नीरा, शहाळ्याचे पाणी, उसाचा रस यासोबतच ताडगोळ्यांची आवक उरणमध्ये वाढली आहे. हे ताडगोळे घेण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत गर्दी होताना दिसते.

उरणमध्ये विशेषतः नागाव परिसरात ताडगोळ्यांची झाडे मोठ्या प्रमाणात असून उन्हाळ्याच्या हंगामात हे फळ मिळते. नागावातील बहुसंख्य घरांतून ताडगोळे झाडावरून काढून नंतर त्यांची बाजारपेठेत विक्री करणे हा पारंपरिक व्यवसाय केला जातो.

पीरवाडी व नागाव परिसरातून दैनंदिन सुमारे २५० ते ३०० डझन ताडगोळे उरण बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध असतात. बाजारपेठेत गरमीच्या हंगामात ताडगोळ्यांची विक्री अधिक होत असून विक्री करणाऱ्याकडून सध्या हेच ताडगोळे ८० ते १०० रुपये दराने विकले जातात.

नागावमधील ताडगोळे पनवेल, नवी मुंबईतही पाठविले जातात. ताडगोळ्याच्या फळामध्ये एका फळात सर्वसाधारण दोन किंवा तीन ताडगोळे असतात. अख्या ताडगोळ्यास बाजारात चांगली किंमत मिळते, असे विक्रेत्यांनी सांगितले.

# ख्रिश्चन बांधवांनी गुड फ्रायडेनिमित्त काढली मिरवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सेंट जोसेफ बिलिव्हर्स ईस्टर्न चर्च, मुंबई डायोसीज कोळखे यांनी गुड फ्रायडे पाळला आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यू आणि त्याच्या दफनविधीच्या स्मरणार्थ मिरवणूक काढली.

गुड फ्रायडे हा लेंट सीझन आणि पवित्र आठवड्यातील सर्वांत पवित्र दिवस आहे. या दिवशी ख्रिस्ती बंधू प्रभु येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यू आणि त्याचे दफन स्मरण इन करतात.

या दिवसाच्या धार्मिक सेवांदरम्यान, ख्रिश्चन बांधवांमध्ये क्रॉस घेऊन जाणाऱ्या दोन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. एक चर्चच्या बाहेर आमच्या प्रभूच्या क्रॉससह गोलगोथापर्यंतच्या प्रवासाचे स्मरण



करणारी, आणि एक चर्चमध्ये हे लक्षात ठेवण्यासाठी की त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी वधस्तंभावरून खाली कसा नेण्यात आला.

ख्रिश्चन बांधवांनी सांगितले की, जसे आपण आपल्या प्रभूच्या मृत्यूचे स्मरण करतो, तेव्हा आपण स्वतःला आठवण करून देतो की तो आपल्या वतीने मरण पावला जेणेकरून आपल्याला तारण मिळावे आणि सदासर्वकाळ जगता येईल. आज आम्ही स्वतःला पुन्हा वचन देतो की, आमचे जीवन त्याच्या त्यागासाठी योग्य आहे, दररोज त्याचा क्रॉस वाहतो आणि त्याच्या प्रेम, सेवा आणि नम्रतेच्या उदाहरणाचे अनुसरण करतो.

बिलिव्हर्स ईस्टर्न चर्च हिज ग्रेस मार्टिन मोर ऍप्रेम एपिस्कोपा, लोकांसाठी प्रार्थना केली. पित्या, येशूच्या दुःख आणि मृत्यूमुळे दुःख सहन करणाऱ्या सर्वांचे ओझे हलके होऊ दे अशी विनवणी केली.

# पाणी जपून वापरा; प्रशासनाचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तापमान वाढीमुळे अनेक जलसाठे आटले आहेत. पनवेलसह जिल्ह्यात बऱ्याच ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवत आहे.

प्रशासनाकडूनही पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वच ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# गोवठणे येथे शिवजयंती उत्सव

**उरण : रामप्रहर वृत्त**

मराठी मुलखाचे आराध्यदैवत, रयतेचा जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या वेळी शिवस्मारक समितीचे सदस्य विनोद म्हात्रे व विलास म्हात्रे यांच्या हस्ते शिवमुर्तीचे पुजन करण्यात आले. यानंतर आरती घेऊन सुंठोऱ्याच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. या वेळी शिवरायांना अभिवादन करण्यासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नेरूळच्या डीपीएस तलावात गुलाबी शेवाळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

फ्लेमिंगोंना गुलाबी रंग देणाऱ्या शेवाळाचे नेरूळच्या डीपीएस तलावात आगमन झाले आहे. वाढती उष्णता, आर्द्रता आणि खारटपणासह पाण्याचे बाष्पीभवन वाढल्यामुळे ओलसर जमिनीच्या काही भागाला गुलाबी रंग प्राप्त होतो. हे शेवाळ आणि बॅक्टेरिया जे कॅरोटीनॉइड्स बनवतात, त्याचा लाल–केशरी रंगद्रव्य, फ्लेमिंगोंचे आवडते खाद्य असून, यामुळे या पक्षाची पिसे गुलाबी होत असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे.

संशोधक आणि सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार हा गुलाबी रंग लाल अल्गल ब्लूमचा परिणाम आहे. मुंबई महानगर प्रदेशातील यापूर्वीही २०१९ आणि २०२० मध्ये असा प्रकार पाहायला मिळाला होता, असे नॅक कनेक्टचे बी. एन. कुमार यांनी सांगितले.

दरवर्षी नेरूळमधील पामबीच रस्त्यावरील डीपीएस तलावात मोठ्या संख्येने फ्लेमिंगोचे थवे डेरेदाखल होतात. फ्लेमिंगोंच्या आकर्षणापोटी अनेक पर्यटक आणि अभ्यासक या काळात डीपीएस तलावर परिसराला भेट देतात. त्यामुळे फ्लेमिंगोंच्या संरक्षणाची बाब लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेने डीपीएस तलावाला कुंपण घातले आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील पाणथळ क्षेत्रात मुबलक अन्न उपलब्ध होत असल्यामुळे स्थलांतरित पक्ष्यांचा तेथे वावर आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत नवी मुंबई 'फ्लेमिंगो सिटी' म्हणून ओळखली जावू लागली आहे. स्थलांतरित पक्षी बघण्यासाठी पर्यटक, पक्षी निरीक्षक तलाव परिसरात गर्दी करतात.

# पनवेल बाजारपेठेत मसाल्याचे पदार्थ खरेदीसाठी लगबग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील मिरची गल्लीत मसाल्याचे विविध प्रकारचे पदार्थ खरेदी करण्यासाठी सध्या बाजारात गृहिणींची एकच लगबग सुरू झाली असून बाजारात खरेदीसाठी गर्दीही वाढू लागली आहे.

बाजारात मिळणारे विविध कंपन्यांचे तयार मसाले परवडत नसल्याने मिरची खरेदी करून त्याचा मसाला बनविण्यावर गृहिणींचा




कल दिसून येतो. त्यामुळे संकेश्वरी, बेडगी, कश्मिरी, गंटूर, लवंगी, कोल्हापुरी मिरची खरेदी करणे, त्याचबरोबर धडे, बडीशोप, अख्खा मसाला, जिरे, मोहरी, हळकुंड आदी मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्यासाठी गृहिणींची लगबग सुरू झाली असल्याचे दिसून येत आहे.

विविध नैसर्गिक आपत्ती, अधूनमधून कोसळणारा अवकळी पाऊस, मिरचीचे उत्पादनात होणारी घट आदींमुळे गतवर्षापेक्षा यावर्षी मसाल्याचे विविध पदार्थांसह मिरचीचेही भाव वाढले असल्याचे दिसून येत असले तरी दैनंदिन जीवनात मसाल्याचे पदार्थ व मसाल्यांची मोठीच आवश्यकता असल्याने किंमती कितीही जरी वाढल्या तरी मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्याचा गृहिणींचा उत्साह मात्र कायम आहे.

**दैनंदिन जीवनात आहारामध्ये सर्व पदार्थात प्रकारच्या मसाल्याचे महत्त्व फार मोठे असल्याने महागाई वाढली, तरी मसाल्याचे पदार्थ हे खरेदीच करावे लागतात.**
**–मानसी हातमोडे, गृहिणी**

# पाणीटंचाई दूर करण्यासाठी नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे उभारणे आवश्यक



**माणगाव : प्रतिनिधी**

सध्याची पाणीटंचाई लक्षात घेता भूगर्भातील पाण्याची पातळी वाढावी व माणगावसह अनेक गावांना भेडसावणारा पाणीप्रश्न कायमचा सुटावा यासाठी येथील नद्यांवर कोल्हापूर पद्धतीचे कच्चे व पक्के बंधारे उभारणे गरजेचे आहे. दरवर्षी उद्‌भवणाऱ्या पाणीटंचाईचा फटका विशेतः दुर्गम भागातील जनतेला मोठ्या प्रमाणात बसत असून दिवसेंदिवस भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. शासनाने पाणी नियोजनाबरोबरच नद्या, ओहळ यावर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधून पाणी अडविल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न निकाली निघेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

कोकणात जोरदार पाऊस पडतो. तेच पाणी वाहून नदीतून समुद्रात जाऊन मिळते, मात्र फारसे जमिनीत मुरत नाही. त्यामुळे इथल्या विहिरीच्या तसेच नदीच्या पाण्याची पातळी वाढत नाही. परिणामी कोकणात कितीही मोठा व मुसळधार पाऊस पडला तरी ते पाणी वाहून नदीमार्गे समुद्रात जाते. त्यामुळे भूर्गभातील पाण्याची पातळी उन्हाळ्यात खाली जाते. दरवर्षी अनेक गावांना पिण्याच्या पाणीटंचाईशी सामना करावा लागतो.

कोकणातील जलविद्युत प्रकल्पाची पाहणी करून रायगड जिल्ह्यात काळ व कुंभे, रत्नागिरी जिल्ह्यात बाव व सप्तलिंगी, तर ठाणे जिल्ह्यात पाट व दमणगंगा या पाच जलविद्युत प्रकल्पांचा बारकाईने अभ्यास केला गेला होता. त्यातील सध्या कार्यान्वित होत असलेला काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्प मिळून ३०.०४ दक्षलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध होणार आहे. शिवाय ४५ मेगावॅट वीज निर्मिती व २३७५ हेक्टर क्षेत्र ओलिताखालीही येणार आहे. त्यामुळे टंचाईग्रस्त गावांचा भविष्यातील पाणीप्रश्न सुटणार आहे. वास्तविक सर्व्हे झालेले प्रकल्प कार्यान्वित झाले असते, तर टंचाईग्रस्त गावांना उन्हाळ्यात मुबलक पाणी मिळाले असते तसेच कोकणात मोठ्या प्रमाणात शेती व शेतीपूरक व्यवसाय तसेच फळबागांचा जिल्हा म्हणून नवी ओळख मिळाली असती.

कोकणात भरपूर पाऊस पडतो. सुमारे ३४०० ते ४००० मिलीमीटर व त्यापेक्षा जास्त पाऊस पडतो, मात्र बहुतांश पाणी समुद्राला जाऊन मिळते. पूर निवारणाला कोट्यवधी रुपये खर्च होतात, तर उन्हाळ्यात शेकडो गावांना बैलगाड्या, टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. संपूर्ण महाराष्ट्रात ४००० टीएमसी पाणी उपलब्ध आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यापैकी ४५ टक्के म्हणजेच १८६२ टीएमसी पाणी एकट्या कोकणात आहे. एवढा पाऊस पडूनही कोकणात बहुतांशी जमीन कोरडवाहू व एकपिकी आहे. आज कोकणात व महाराष्ट्रात वीजटंचाई मोठ्या प्रमाणात आहे तसेच भूर्गभातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे. पाण्याअभावी वीजनिर्मिती पुरेशी होत नाही. त्यामुळे सर्वच उद्योगधंद्यावर याचा परिणाम होत आहे. इस्त्राईलमध्ये १०० मिलीमीटर पाऊस पडतो. त्यातील ७० ते ८० मिलीमीटर पावसाच्या पाण्याचा उपयोग केला जातो. कोकणात ४००० मिलीमीटर पाऊस पडतो, परंतु १० मिलीमीटरही पाणी अडवले जात नाही. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो.

माणगाव तालुक्यात आजही २४ गावे आणि ३२ वाड्यांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. दरवर्षीच्या तुलनेत रायगड जिल्ह्यात यंदा पुरेसा पाऊस पडला, मात्र हे पाणी नद्यांवर बंधारे नसल्याने ते वाहून गेले. त्यामुळे नद्या, ओहळ, ओढे उन्हाळ्यापूर्वीच कोरडे पडले आहेत. परिणामी विहिर व बोअरवेलच्या पाण्याची पातळी खालावली आहे. याचे चटके आता नागरिकांना बसू लागले आहेत. हे सर्व पाहता नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे उभारणे आवश्यक आहे.

## खालापुरातून गावठी पिस्तुल आणि पाच जिवंत काडतुसांसह एकाला पकडले

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत चौकफाटा परिसरात एका व्यक्तीला गावठी रिव्हॉल्व्हर व पाच जिवंत काडतुसांसह पकडले. त्याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असून या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस सतर्क आहेत. लोकसभा निवडणूक शांततेत पार पडावी म्हणून जिल्ह्यात गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना तसे आदेश दिलेले आहेत. त्या दृष्टीने जिल्ह्यात अवैध शस्त्रे, अमली पदार्थ, अवैध दारू यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना २८ मार्च रोजी सायंकाळी गोपनिय माहिती मिळाली की, खालापूर पोलीस ठाणे हद्दीत चौकफाटा परिसरात एक व्यक्ती अवैधरित्या स्वतः कडे गावठी रिव्हॉल्व्हर बाळगून फिरत आहे. त्यानंतर खाडे यांनी तात्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन व कर्मचाऱ्यांचे पथक नेमून त्या परिसरात पाठविले.

पोलीस पथकाने शोध घेतला असता एक व्यक्ती संशयितरित्या फिरताना आढळून आला. लागलीच पथकाने संशयित इसमास शिताफीने ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव नरेश धोंडू देशमुख असे सांगितले. पथकाने दोन पंचांना बोलावून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी रिव्हॉल्व्हर व पाच जिवंत काडतुसे मिळून आली.

याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. आरोपी नरेश देशमुख यास अटक करण्यात आली. न्यायालयाकडून आरोपीस दोन दिवस पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास गुन्हे अन्वेषण शाखेचे हवालदार सुधीर मोरे करीत आहेत.



## नागोठण्यात शिवजयंती उत्साहात साजरी

**नागोठणे : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती नागोठणे नगरीत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त शहर शिवमय झाले होते.

सकाळी १० वाजता गवळआळीतील शिवप्रेमींनी किल्ले रायगड येथून आणलेल्या शिवज्योतीचे विधीवत पूजन करून व महाशिवआरती घेऊन स्वागत करण्यात आले. या वेळी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मुकेश भोय, उपाध्यक्ष संजय पिंपळे व संजय पाटील, सचिव पंकज कामथे, खजिनदार अनिल महाडिक, सहसचिव अल्वीन नाकते, सहखजिनदार नागेश सुर्वे आदींसह शिवप्रेमी उपस्थित होते.

शिवजयंती उत्सवानिमित्त सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत रथ, नाचणारा घोडा, वेशभूषा केलेले शिवराय, बाल शिवराजे, जिजामाता, मावळे यांचा समावेश होता. खालूचा बाजा, ढोल-ताशांचा गजर, मर्दानी खेळ तसेच भगवे फेटे परिधान केलेल्या हजारो शिवप्रेमींच्या उपस्थितीत वाजत-गाजत फटाक्याच्या आताषबाजीत मिरवणूक निघाली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेवच्या गजरात निघालेली ही मिरवणूक विविध ठिकाणी फिरल्यानंतर तिची सांगता करण्यात आली. दरम्यान, या मिरवणुकीचे जागोजागी जंगी स्वागत व महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.






**रोहा : रायगड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवल व तहसीलदार किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी तथा प्रभारी निवडणूक नायब तहसीलदार उज्ज्वला अंधारे यांच्या उपस्थितीत प्राथमिक शिक्षक, अधिकारी यांनी मतदान जनजागृती केली. या अनुषंगाने पंचायत समिती ते तहसील कार्यालयापर्यंत बाईक रॅली काढण्यात आली होती.**

## माथेरानमध्ये रंगपंचमी उत्साहात साजरी

### परदेशी पाहुण्यांनी लुटला मनमुराद आनंद

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान येथे पारंपरिक पद्धतीने रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी माथेरानमध्ये आलेल्या परदेशी पाहुण्यांनीही रंगपंचमीचा मनमुराद आनंद घेतला माथेरान मधील स्थानिकांबरोबर एकमेकांवर रंग उधळत आनंद साजरा केला.

माथेरानमध्ये अनेक वर्षांपासून होळीच्या पाचव्या दिवशी रंगपंचमीचा सण मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा करण्यात येतो. येथे कोकण व घाटमाथ्यावरील संस्कृतीनुसार धुळवड साजरी न होता रंगपंचमी स्थानिकांसाठी मोठा उत्सव असतो. रंगपंचमीच्या दिवशी दुपारी मुख्य बाजारपेठेत सर्व स्थानिक एकत्र येत रंगपंचमीचा आनंद घेत असतात. यामध्ये सर्वधर्मीय सहभागी होताना पहावयास मिळते. या वेळी माथेरानमध्ये आलेल्या परदेशी पाहुण्यांनीदेखील रंगपंचमीचा आनंद लुटला.





## काजूगर झाले स्वस्त, खवय्यांची पसंती

### शेकडा १०० ते १५० रुपये दर

**माणगाव : प्रतिनिधी**

शिमगोत्सवादरम्यान काजूगर स्वस्त झाल्याने खवय्यांनी समाधान व्यक्त केले आहे. माणगाव तालुक्यातील बाजारपेठेत काजूगराची आवक वाढल्याने महाग मिळणारे काजूगरांना आता स्वस्ताई आली आहे.

रानमेव्यासाठी प्रसिद्ध असलेली माणगाव तालुक्याची बाजारपेठ ओल्या काजूच्या विक्रीचे एक केंद्र बनत आहे. आजूबाजूच्या डोंगरातील वस्तीवरून काजूगर विक्रीसाठी येणाऱ्या आदिवासी महिलांना रोजीरोटीचे चांगले साधन यानिमित्ताने उपलब्ध झाले आहे. शेकडा १५० रुपये ते २०० रुपयांना मिळणारे काजूगर गेल्या काही दिवसांत आवक वाढल्याने स्वस्त झाले असून या दिवसात शेकडा १०० ते १५० रुपयांना मिळत आहेत.



गेल्या काही दिवसांपूर्वी शेकडा २०० रुपयांना काजूगर मिळत होते, मात्र गेल्या काही दिवसांत आवक वाढली असल्याने खवय्ये व पर्यटकांनी काजू खरेदी करण्याकडे पसंती दिली असून ऐन सणासुदीत काजूगर स्वस्त झाल्याने खवय्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या दिवसात मिळणारे काजूगर अत्यंत चविष्ट असतात. खास गावावरून दरवर्षी आम्ही हमखास काजूगर नेतो, मागवितो. आता हंगाम सुरू झाला असून काजूगर स्वस्त झाले आहेत, असे काजूगरप्रेमीबाळाराम मांडवकर यांनी सांगितले, तर गेल्या काही दिवसांत सुरुवातीला काजूगर काहीसे महाग होते. आता रानातून बऱ्यापैकी काजूगर मिळू लागले आहेत. त्यामुळे थोडे स्वस्त झाले आहेत. काही दिवसांपासून १५० ते २०० रुपयांना विकले जाणारे काजूगर १२० रुपयांपासून पुढे विकले जात आहेत, असे विक्रेत्या मंजुळा जाधव यांनी सांगितले.

# कोलकाताची विजयी घोडदौड

## बंगळुरूची हार



**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सात विकेट्सनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील सलग दुसरा विजय नोंदवला.

या सामन्यात कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून बंगळुरूला फलंदाजासाठी आमंत्रित केले होते. प्रथम फलंदाजी करायला आलेल्या बंगळुरू संघाने विराट कोहलीच्या नाबाद ८३ धावांच्या जोरावर सहा बाद १८२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात कोलकाताने १८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना व्यंकटेश अय्यरच्या अर्धशतकाच्या जोरावर १६.५ षटकांत तीन गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केले. कर्णधार श्रेयस अय्यरने कोलकातासाठी विजयी षटकार मारला तसेच बंगळुरूमधील आपल्या विजयी विक्रम कायम राखला.

१८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी कोलकाताला दमदार सुरुवात करून दिली. बंगळुरूच्या गोलंदाजांची धुलाई करताना दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८६ धावांची भागीदारी केली. सातव्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मयंक डागरने ही भागीदारी मोडली. नरेन २२ चेंडूंत ४७ धावा करून बाद झाला. त्याने २१३.६३च्या स्ट्राईक रेटने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. त्याचवेळी सॉल्टने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ३० धावा केल्या.

या सामन्यात व्यंकटेश अय्यर आणि श्रेयस अय्यर यांच्यात चांगली भागीदारी झाली. संघाला तिसरा धक्का व्यंकटेशच्या रूपाने बसला. २९ चेंडूंत अर्धशतक झळकावून तो पॅव्हेलियनमध्ये परतला. १६व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर यश दयालने या फलंदाजाला आपला बळी बनवले. त्याने कर्णधारासह ७५ धावांची भागीदारी केली.

रिंकू सिंग पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि पाच धावा करून नाबाद राहिला, तर श्रेयस अय्यरने षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. त्याने २४ चेंडूंचा सामना केला आणि १६२.५०च्या स्ट्राइक रेटने ३९ धावा केल्या. या काळात तो नाबाद राहिला. बंगळुरूकडून विजयकुमार, मयंक डागर आणि यश दयाल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेपेक गमावून फलंदाजीला आलेल्या बंगळुरूने घरच्या मैदानाचा फायदा घेत संघाने २० षटकांत सहा गडी गमावून १८२ धावा केल्या होता. यामध्ये विराट कोहलीने नाबाद ८३ धावांची खेळी करीत महत्त्वाचे योगदान दिले. संघाचा कर्णधार फाफ डुप्लेसिस आठ धावा करून बाद झाला. त्याचवेळी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कॅमेरून ग्रीनने विराटसोबत दुसऱ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी केली. ग्रीन २१ चेंडूंत ३३ धावा करून बाद झाला. नवव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रसेलने ग्रीनला आपला बळी बनवले.

बंगळुरू संघाला तिसरा धक्का मॅक्सवेलच्या रूपाने बसला, ज्याला सुनील नरेनने आपला बळी बनवले. या सामन्यात रजत पाटीदार आणि अनुज रावत प्रत्येकी तीन धावा करून बाद झाले. त्याचवेळी दिनेश कार्तिकने विराटसह सहाव्या विकेटसाठी ३१ धावांची भागीदारी केली. कोलकाताकडून आंद्रे रसेल आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर नरेनला एक यश मिळाले.



## नागोठणे प्रीमियर लीगचे उद्घाटन

### आचारसंहितेचे पालन करून स्पर्धा यशस्वी करा -आ. अनिकेत तटकरे

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे क्रिकेट असोसिएशनने प्रीमियर लीगच्या माध्यमातून विभागातील खेळाडूंना चांगली संधी निर्माण करून दिली असून या स्पर्धेच्या माध्यमातून चांगल्या दर्जाचे खेळाडू आपल्याला पहावयास मिळणार आहेत. भविष्यात डब्लूपीएलप्रमाणे नागोठणे विभागातील महिलांसाठीदेखील संधी उपलब्ध करून द्या. त्यासाठी माझे सर्वतोपरी सहकार्य राहील, असा विश्वास व्यक्त करून आचारसंहितेचे पालन करून ही स्पर्धा यशस्वी करा, असे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले.

नागोठणे प्रीमियर लीगचे आयोजन वेलशेत येथील जाखमाता क्रिडांगणावर २९ व ३० मार्च रोजी दिवस रात्र स्वरूपात करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास राष्ट्रवादीचे नेते विलास चौलकर, भाजप नेते किशोर म्हात्रे, पिगोंडे सरपंच व राष्ट्रवादीचे विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शिंदे, शिवसेनेचे युवा नेतृत्व मनोज खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते अनिल डाकी, विनय गोळे, जुगनशेठ जैन, राकेश शिंदे, पिगोंडे माजी उपसरपंच राजेंद्र लवटे, नाना बडे, सुभाष पाटील, मंदार कोतवाल, प्रल्हाद पारंगे, अंकुश ताडकर, गंगाराम पारंगे, अरुण चोगले, रमेश पारंगे,असोसिएशनचे अध्यक्ष राजेश पिंपळे, उपाध्यक्ष सुधीर भोय, सचिव गिरीष मढवी, सहसचिव सुनील बडे, सदस्य स्वप्नील भोसले, जयेश बावकर, विशाल म्हात्रे, निलेश पिंपळे, प्रमोद चोगले, अमोल ताडकर आदींसह क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

उद्घाटनीय सामना जाखमाता शुभ इलेव्हन विरुद्ध ज्वाला नागोठणे या संघांत खेळविण्यात आला. यात जाखमाता शुभ इलेव्हन संघाने बाजी मारत विजयी सलामी दिली.

## आदेश कोळीचे सायकलिंग स्पर्धेत यश



**उरण : बातमीदार**

हरियाणातील पंचकुला येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पेशल ऑलम्पिक भारत नॅशनल सायकलिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत उरणच्या हनुमान कोळीवाडा येथील खेळाडू आदेश राम कोळी याने यश प्राप्त केले आहे.

आदेश कोळी हा स्वामी ब्रम्हानंद सी बर्ड विशेष शाळेत शिकत आहे. त्याने या स्पर्धेत दोन किलोमीटर सायकलिंग शर्यतीत रौप्यपदक, तर तीन किलोमीटर सायकलिंग स्पर्धेत कांस्यपदक पटकाविले. भारतातून एकूण ४०० खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यातून आदेशने यश प्राप्त केले. त्याला क्रीडा शिक्षक गोपाळ म्हात्रे व महाराष्ट्र राज्य कोच दयानंद पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल आदेशवर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेच्या ट्रस्टी शिरीष पुजारी, शिक्षिका चारू शहा, छाया, मधुर उपाध्याय, पल्लवी परदेशी, राकेश म्हात्रे, मानसी पांचाळ, प्रशांत कदम, गणेश जाधव यांनी आदेश कोळीचे अभिनंदन केले.

## क्रिकेट स्पर्धेत राजेंद्र इलेव्हन संघ प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मोठे शहापूर येथील वीर बजरंग क्रीडा मंडळाच्या वतीने तेथील आदर्श विद्यामंदिर आदर्श नगर या ठिकाणी दिवस रात्र स्वरूपाची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राजेंद्र इलेव्हन संघ प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत पंचक्रोशितील २१ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन सुदर्शन पाटील, अनिल म्हात्रे, परदेसी थळे यांच्या हस्ते झाले. द्वितीय क्रमांक इलेव्हन फायटर, तृतीय बहिरीचापाडा आणि चतुर्थ क्रमांक न्यू अष्टविनायक संघाने मिळविले. स्पर्धेस जाणकार पंच व दर्दी प्रेक्षकांची उत्तम साथ लाभली.

## आयपीएल षटकारांमध्ये विराटने टाकले धोनीला मागे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामातील दहाव्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना कोलकाता नाइट रायडर्सशी झाला. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात कोलकाताचा सलामीवीर विराट कोहलीने अर्धशतकी खेळी केली. यादरम्यान त्याने महेंद्रसिंह धोनीचा एक मोठा विक्रमही मोडला.

कोलकात्याविरुद्ध तीन षटकार मारल्यानंतर विराटने आयपीएलमध्ये २४० षटकार पूर्ण केले. यासह त्याने महेंद्रसिंह धोनीला मागे टाकले आहे. धोनीने २५२ आयपीएल सामन्यांच्या २१८ डावांमध्ये २३९ षटकार मारले आहेत, तर विराटने आतापर्यंत आयपीएलच्या २४० सामन्यांच्या २३२ डावांमध्ये २४० गगनचुंबी षटकार मारले आहेत. आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आता विराट कोहली चौथ्या स्थानावर पोहचला आहे. याशिवाय विराट आरसीबीकडून सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनला आहे. याआधी हा विक्रम ख्रिस गेलच्या (२३९) नावावर होता.

## वेदनाशामक औषधे घेऊन रियान परागची जबरदस्त खेळी



**जयपूर : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाविरुद्धच्या सामन्यात राजस्थान रॉयल्ससाठी निर्णायक खेळी करणारा रियान पराग गेले तीन दिवस आजारी होता. मी अंथरुणाला खिळून होतो आणि वेदनाशामक औषधे घेऊन या सामन्यात खेळलो, असे रियानने सामन्यानंतर सांगितले.

देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वांत प्रतिभावान खेळाडूंपैकी एक अशी रियानची ओळख आहे. देशांतर्गत स्पर्धांमध्ये आसामसाठी चमकदार कामगिरी करणाऱ्या रियानला गेल्या काही वर्षांत आयपीएलमध्ये मात्र फारसे यश मिळाले नव्हते. असे असले तरी राजस्थान रॉयल्सने त्याच्यावरील विश्वास कायम राखला आणि यंदाच्या हंगामात त्याला चौथ्या क्रमांकावर खेळण्याची संधी दिली. या संधीचे सोने करताना त्याने पहिल्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध २९ चेंडूंत ४३ धावांची खेळी केली. त्यानंतर कामगिरीत आणखी सुधारणा करताना त्याने गुरुवारी झालेल्या दिल्लीविरुद्धच्या सामन्यात ४५ चेंडूंत नाबाद ८४ धावा फटकावल्या. ट्वेन्टी-२० कारकीर्दीतील ही त्याची सर्वोत्तम खेळी ठरली आहे. त्याच्या या खेळीच्या जोरावर राजस्थानने दिल्लीवर १२ धावांनी विजय मिळवला.

दिल्लीविरुद्ध सामनावीराचा पुरस्कार स्वीकारताना रियान म्हणाला की, मी गेले तीन दिवस अंथरुणाला खिळून होतो आणि वेदनाशामक औषधे घेऊन सामन्यात खेळलो. मला काहीही करून सामन्यात खेळायचे होते. त्यामुळे मी खूप खूश आहे. माझ्यासाठी ही खेळी खास आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानची ३ बाद ३६ अशी स्थिती होती, परंतु रियानने अप्रतिम खेळी करताना राजस्थानला २० षटकांत पाच बाद १८५ धावांपर्यंत पोहचवले. त्याने आनरिख नॉर्किएने टाकलेल्या २०व्या षटकात २५ धावा काढल्या.

'माझी आई हा सामना बघायला आली होती. गेल्या तीन-चार वर्षांत मी घेतलेली मेहनत तिने पाहिली आहे. मी इतरांच्या मतांचा फार विचार करीत नाही. माझ्यात असलेली क्षमता मला ठाऊक आहे. मी किती धावा करतो, यश मिळवतो की अपयशी ठरतो याने मी स्वत:वरील विश्वास कमी होऊ देत नाही. यंदाच्या देशांतर्गत हंगामात मी चांगली कामगिरी केली. त्यामुळे आयपीएल हंगामापूर्वी माझा आत्मविश्वास दुणावला होता,' असेही रियानने नमूद केले.

## वाद विसरून विराट-गौतम यांनी घेतली गळाभेट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाइट रायडर्स संघांत झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि कोलकाताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी एकमेकांची भेट घेतली आणि मिठी मारली, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

ही घटना डावातील १६ षटकांनंतर स्ट्रेटेजिक टाइम आऊट सुरू असताना घडली. यादरम्यान विराटने आणि गौतम एकमेकांना भेटताना दिसले. स्ट्रेटेजिक टाइम आऊटदरम्यान दोन्ही संघांचे खेळाडू रणनीती तयार करीत होते. या वेळी कोलकाता कॅम्पमधील गौतम गंभीर आणि आरसीबीकडून विराट कोहली भेटले. दोघांनी एकमेकांना मिठी मारली.

यादरम्यान गंभीरने हातवारे करत विराट कोहलीला काही तरी विचारताना दिसला. या वेळी दोन्ही खेळाडू खूप आनंदी दिसत होते. त्यांच्या भेटीचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. याआधी गेल्या मोसमात दोघांमध्ये वाद झाला होता. गंभीर तेव्हा लखनऊ सुपर जायंट्सच्या सपोर्ट स्टाफचा भाग होता.

## लखनऊ संघाकडून डेव्हिड विलीच्या जागी मॅट हेन्री करारबद्ध

**लखनऊ : वृत्तसंस्था**


इंग्लंडच्या अनेक खेळाडूंनी आगामी टी-ट्वेंटी वर्ल्ड कपच्या पार्श्वभूमीवर आयपीएलकडे कानाडोळा केलाय. अशातच आता इंग्लंडचा स्टार ऑलराउंडर डेव्हिड विली याने आयपीएल २०२४मधून माघार घेतली आहे. लखनऊने विलीला ऑक्शनमध्ये दोन कोटी रुपयांना विकत घेतले होते, मात्र आता त्याने वैयक्तिक कारण सांगून स्पर्धेतून आपले नाव मागे घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्या जागी कर्णधार केएल राहुलने थेट न्यूझीलंडच्या एका खेळाडूला संघात दाखल करून घेतले आहे.



डेव्हिड विलीच्या जागी लखनऊने न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीचा संघात समावेश केल्याची माहिती आयपीएलच्या अधिकृत अकाऊंटवरून देण्यात आली आहे. लखनऊने हेन्रीला १.२५ कोटी रुपयांच्या मूळ किमतीत संघात घेतले आहे. लखनऊने एक पत्रक जाहीर करीत याची घोषणा केली.

मॅट हेन्रीने आतापर्यंत २५ कसोटी सामने खेळले आहेत. त्यात त्याने ९५ विकेट घेतल्या आणि ६०० धावा केल्या आहेत. ८२ एकदिवसीय सामन्यांत १४१ फलंदाजांना त्याने तंबूत पाठवलंय, तर १७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये न्यूझीलंडकडून २० विकेट्स घेतल्या आहेत. हेन्रीने आतापर्यंत दोन आयपीएल सामने खेळले आहेत. तो आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्जच्या संघाचा भाग होता.

## सुनील नरेनचे ५०० टी-२० सामने पूर्ण



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्या खेळायला उतरताच कोलकाता नाईट रायडर्स संघाचा स्टार खेळाडू सुनील नरेनने एक ऐतिहासिक पराक्रम केला आहे. टी-२० फॉरमॅटमध्ये ५०० किंवा त्याहून अधिक सामने खेळणारा तो जगातील केवळ चौथा क्रिकेटपटू ठरला आहे.

कोलकाता आणि बंगळुरू यांच्यातील आयपीएल सामना फिरकीपटू सुनील नरेनसाठी खूप खास राहिला, कारण हा त्याचा टी-२० फॉरमॅटमधील ५००वा सामना होता. त्याच्या आधी किरॉन पोलार्ड, ड्वेन ब्राव्हो आणि शोएब मलिक यांनी ही कामगिरी केली आहे. पोलार्ड हा क्रिकेटच्या या सर्वांत लहान फॉरमॅटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू आहे. त्याच्या नावावर ६६० सामन्यांची नोंद आहे.

२०११मध्ये पदार्पण केल्यापासून नरेनने टी-२० फॉरमॅटमध्ये बॉल आणि बॅट दोन्हीसह शानदार कामगिरी केली आहे. त्याने आतापर्यंत ५३७ विकेट घेतल्या आहेत. या बाबतीत तो फक्त ड्वेन ब्राव्हो (६२५) आणि राशिद खान (५६६) मागे आहेत. नरेनचा इकॉनॉमी रेट ६.१० आहे, जो त्यांच्या टी-२० कारकिर्दीत २०००पेक्षा जास्त चेंडू टाकलेल्या खेळाडूंमध्ये दुसरा सर्वोत्तम आहे. सॅम्युअल बद्रीच्या कारकिर्दीत १९७ सामन्यांतील सर्वोत्तम इकॉनॉमी रेट ६.०८ आहे. ऑफस्पिनर नरेननेही आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत ३० मेडन षटके टाकली आहेत, जी पुरुषांच्या टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोच्च आहे.

सुनील नरेन हा वेळप्रसंगी मोठे फटके मारण्यातही माहीर आहे. बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात त्याने सलामीला येताना २२ चेंडूंत ४७ धावा चोपल्या. यामध्ये दोन षटकार आणि पाच चौकारांचा समावेश होता, तर गोलंदाजीत त्याने एक विकेट घेतली.

जीवेत् शरदः शतम्!
नितीन मढवी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
समीर भगत

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com